


दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25




अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २१७। किंमत - ४ रू । संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) । रविवार ०६/०९/२०२६ । पाने - ६




# मंगलवाद्यांचा नाद घुमू द्या, डीजेचा गोंगाट थांबवा

## ध्वनी प्रदूषणमुक्त संगमनेरसाठी नागरिकांचे जनआवाहन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : भारतीय संस्कृतीतील सण-उत्सव हे केवळ आनंदाचे सोहळे नसून समाजाला एकत्र आणणारे, परस्परांमध्ये स्नेह निर्माण करणारे आणि सांस्कृतिक परंपरा जपणारे माध्यम आहेत. लोकमान्य टिळकांसह तत्कालीन समाजनेत्यांनी गणेशोत्सव, शिवजयंती यांसारख्या सार्वजनिक उत्सवांना सामाजिक आणि जनप्रबोधनाचे स्वरूप दिले. त्यामुळे हे उत्सव आज सामूहिक आनंद आणि सामाजिक एकजुटीचे प्रतीक बनले आहेत.

भारतीय परंपरेत कोणत्याही मंगल कार्याला मंगलवाद्यांची साथ देण्याची प्रथा आहे. लग्नसमारंभातील बँड, संबळ-ताशा, वारकरी दिंडीतील पखवाज, टाळ, वीणा, हार्मोनियम तसेच शाहिरांच्या पोवाड्यांनी शेकडो वर्षांपासून उत्सवांना सांस्कृतिक रंग दिला आहे. या पारंपरिक वाद्यांचे सूर वातावरणात प्रसन्नता, उत्साह आणि आपलेपणा निर्माण करतात.

मात्र, गेल्या काही दशकांत तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरासोबत मोठ्या आवाजातील ध्वनिक्षेपक आणि डीजे संस्कृतीचा प्रसार झाला आहे. उत्सवांमध्ये आवाजाची तीव्रता आणि ध्वनिवर्धकांच्या वापराबाबत एकप्रकारची स्पर्धाच निर्माण झाल्याचे दिसून येते. दाट नागरी वस्ती, रुग्णालये, शाळा, महाविद्यालये, कार्यालये तसेच निवासी परिसरात मोठ्या आवाजामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागतो.

ध्वनीप्रदूषणाचा परिणाम केवळ शांततेवर होत नाही, तर त्याचा आरोग्यावरही विपरीत परिणाम होऊ शकतो. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण तसेच प्राणी-पक्ष्यांनाही मोठ्या आवाजाचा त्रास होतो. (पान २ )

### ध्वनिप्रदूषण टाळत गणेशोत्सव साजरा करा : जिल्हाधिकारी

**गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ध्वनिप्रदूषणाला आळा घालण्यासाठी प्रशासनाने कडक उपाययोजना सुरू केल्या आहेत. गणेश मंडळांनी लाऊडस्पीकर तसेच ध्वनिवर्धकांचा वापर करताना शासनाच्या नियमांचे काटेकोर पालन करावे. न्यायालयाच्या निर्देशानुसार ध्वनिप्रदूषणमुक्त वातावरणात गणेशोत्सव साजरा करण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले. संगमनेर शहरातील प्रांताधिकारी कार्यालयात आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत पत्रकारांशी संवाद साधताना जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी गणेशोत्सवाच्या नियोजनाबाबत प्रशासनाची भूमिका स्पष्ट केली. बैठकीस प्रांताधिकारी अरुण उडे, तहसीलदार धीरज मांजरे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर दोन दिवसांपूर्वी जिल्हास्तरीय बैठक घेण्यात आली असून, त्यामध्ये न्यायालयाच्या नियमांचे पालन करून ध्वनिप्रदूषणमुक्त गणेशोत्सव साजरा करण्याबाबत संबंधित विभागांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. पोलीस प्रशासनालाही याबाबत स्पष्ट निर्देश देण्यात आले असून, गणेशोत्सव मंडळांसोबत बैठक घेऊन त्यांना नियमांची माहिती देण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत.**

# आंदोलन निर्णायक वळणावर जरांगेंनी उपचार सोडले



जालना (वृत्तसंस्था)

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या अनेक महत्त्वाच्या घडामोडी घडत आहेत. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी जालना जिल्ह्यातील अंतरवली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांनी सुरू केलेल्या उपोषणाचा आज आठवा दिवस आहे. मराठा आंदोलकांनी काल रात्रीपासूनच उपोषणस्थळी मोठ्या संख्येने गर्दी केली असून, राज्यभरातील विविध भागांतून आंदोलक अंतरवली सराटीमध्ये पोहोचले आहेत. आता जरांगे पाटील यांनी रात्रीपासून पुन्हा उपचार घेणे बंद केले असल्याने त्यांची तब्येत खालवली आहे. त्यांच्या या निर्णयाने अनेक मराठा आंदोलकांची चिंता वाढली आहे. जोपर्यंत मागण्यांची अंमलबजावणी होत नाही, तोपर्यंत आता काहीही घेणार नसल्याचा पवित्रा त्यांनी घेतला आहे. मागण्या पूर्ण झाल्यानंतरच उपचार घेणार, असे त्यांनी स्पष्ट केले.उपचार बंद करण्याबाबत बोलताना ते म्हणाले की, सरकारने ५८ लाख नोंदी सुरू करण्याचे आश्वासन दिले होते. पण अजूनही ते काम सुरू झालेले नाही. हैदराबाद गॅझेटच्या वैधतेबाबतही कोणतीही ठोस कारवाई झाली नाही. गावांमध्ये दवंड्या पिटण्याचे सांगितले होते, पण तेही केले गेले नाही. हैदराबाद गॅझेटनुसार वैधता देण्याबाबतही स्पष्टता नाही.

२०१२ च्या जात पडताळणी कायद्यात मराठा समाजाचा समावेश करण्यासाठी मुख्यमंत्र्यांना भेटण्याचे आश्वासन शिष्टमंडळाने दिले होते. पण अजूनही शिष्टमंडळ मुख्यमंत्र्यांना भेटलेले नाही. यामुळे हैदराबाद गॅझेटच्या वैधतेचा प्रश्न अद्याप सुटलेला नाही. त्यामुळे जरांगे यांनी उपचार पुन्हा बंद केले आहेत.मराठा समाजाच्या मागण्या पूर्ण होईपर्यंत मनोज जरांगे काहीही स्वीकारणार नसल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. आंदोलनातील ही नवी भूमिका मराठा समाजात चर्चेचा विषय ठरली आहे. जरांगे यांच्या आरोग्याबाबत चिंता व्यक्त होत असतानाही ते मागण्यांच्या पूर्ततेशिवाय माघार घेण्यास तयार नाहीत. सरकारकडून आता ठोस पावले उचलली जातील का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. जरांगे यांचे उपोषण आणि उपचार बंद करण्याचा निर्णय आंदोलनाला नवे वळण देणारा ठरला आहे.

# सिग्नल बंद, बसस्थानक परिसरात वाहतूक कोंडी; नागरिकांचा संताप



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शनिवार असल्याने शहरात आठवडे बाजारासाठी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. त्यातच बसस्थानकाजवळील सिग्नल यंत्रणा काही काळ बंद असल्याने वाहतुकीचा खोळंबा निर्माण झाला. सिग्नल बंद असल्यामुळे वाहनांची ये-जा विस्कळीत होऊन चौक परिसरात वाहनांच्या रांगा लागल्या.

आठवडे बाजारामुळे आधीच वाढलेली वाहनांची वर्दळ आणि त्यात सिग्नल बंद असल्याने वाहतूक कोंडीत आणखी भर पडली. यामुळे वाहनचालक, प्रवासी तसेच पादचाऱ्यांना काही काळ अडचणींचा सामना करावा लागला. वाहतूक सुरळीत करण्यासाठी संबंधित यंत्रणेने सिग्नल व्यवस्था तातडीने कार्यान्वित करून आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात आली.

# संगमनेरमध्ये दोन लाखांच्या एम.डी. ड्रग्जसह तरुण जेरबंदब

## ३९ ग्रॅम मेफेड्रोनसह दुचाकी जप्त, आरोपीला चार दिवस पोलीस कोठडी

युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर-

संगमनेर शहरात अंमली पदार्थांची बेकायदेशीर विक्री करणाऱ्यांविरोधात शहर पोलिसांनी पुन्हा एकदा धडक कारवाई केली आहे. बसस्थानक परिसरात सापळा रचून पोलिसांनी १ लाख १७ हजार रुपये किमतीचे ३९ ग्रॅम एम.डी. (मेफेड्रोन) ड्रग्ज जप्त केले. या कारवाईत गुन्ह्यात वापरलेली ९० हजार रुपये किमतीची विनानंबर दुचाकीही ताब्यात घेण्यात आली असून, एकूण २ लाख ७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी कासीफ असद कुरेशी (वय २७, रा. कादरी मस्जिदजवळ, भारतनगर, संगमनेर) याला अटक करण्यात आली आहे. न्यायालयाने त्याला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.



शहर पोलिसांना संगमनेर बसस्थानक परिसरात एक तरुण अंमली पदार्थ विक्रीसाठी येणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. माहितीची खातरजमा करून पोलिसांनी तत्काळ सापळा रचला. संशयित कासीफ कुरेशी याला ताब्यात घेतल्यानंतर त्याची झडती घेण्यात आली असता त्याच्याकडे ३९ ग्रॅम वजनाचे एम.डी. ड्रग्ज आढळून आले. पोलिसांनी ड्रग्जसह गुन्ह्यात वापरलेली विनानंबर दुचाकीही जप्त केली.

या प्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस कॉन्स्टेबल राहुल पांडे यांच्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध गुन्हा रजिस्टर क्रमांक ८३५/२०२६ अन्वये अमली औषधी द्रव्य व मनःप्रभावी पदार्थ अधिनियम १९८५ मधील कलम ८(क), २२(ब) तसेच भारतीय न्याय संहिता (इछ्ड) २०२३ मधील कलम २२१ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत सावंत, विजय आगलावे, विजय खुळे, राहुल पांडे, अतुल उंडे आणि बाबासाहेब सातपुते यांच्या पथकाने केली. कारवाईची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी कुणाल सोनवणे आणि पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांनी घटनास्थळी भेट देऊन कारवाईची पाहणी केली.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत सावंत करीत आहेत.












# नाशिक जिल्ह्यातील १३ कृषी सेवा केंद्रांचे परवाने निलंबित




युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण कृषी निविष्ठा उपलब्ध करून देण्यासाठी कृषी विभागाने जिल्ह्यात कारवाई सुरू केली आहे. तपासणीदरम्यान नियमांचे उल्लंघन आढळलेल्या जिल्ह्यातील आणखी १३ कृषी सेवा केंद्रांचे परवाने निलंबित करण्यात आले असून आतापर्यंत १५४ परवाने निलंबित करण्यात आले आहेत, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र माने यांनी दिली आहे. खरीप हंगाम २०२६ च्या नियोजनांतर्गत शेतकऱ्यांना बियाणे, खते आणि कीटकनाशकांची गुणवत्तापूर्ण विक्री सुनिश्चित करण्यासाठी जिल्ह्यातील कृषी सेवा केंद्रांची तपासणी करण्यात येत आहे. या अनुषंगाने परवाना अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्या दालनात झालेल्या सुनावणीदरम्यान नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कृषी सेवा केंद्रांवर कारवाई करण्यात आली.

तपासणीदरम्यान e-POS मशीनमध्ये अनियमितता असणे, दर फलक व साठाफलक अद्ययावत नसणे, अभिलेखे व्यवस्थित न ठेवणे, एन फॉर्ममध्ये साठा रजिस्टर न ठेवणे, शेतकऱ्यांना पावती न देणे आदी त्रुटी आढळल्या. संबंधित कायद्यान्वये नोटीस बजावून आज प्रत्यक्ष सुनावणी घेण्यात आली. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कृषी सेवा केंद्रांवर परवाना निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.खरीप हंगामामध्ये शेतकऱ्यांची फसवणूक टाळण्यासाठी ९ एप्रिल २०२६ पासून आजअखेर खते १०८, बियाणे २६ व कीटकनाशके २० असे एकूण १५४ परवाने निलंबित करण्यात आले आहेत. तसेच एकूण ५२ परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आले आहेत. राज्यात परवान्यावर सर्वाधिक कारवाई करणारा जिल्हा म्हणून नाशिक जिल्हा ठरला आहे.

शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून खरीप हंगामाचे नियोजन करण्यात आले आहे. कोणत्याही परिस्थितीत निकृष्ट दर्जाच्या निविष्ठांची विक्री किंवा जादा दराने विक्री होणार नाही, याची खबरदारी घ्यावी. कृषी सेवा केंद्रांमध्ये कृषी विभागाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. माने यांनी केले आहे.

शेतकऱ्यांनी अधिकृत कृषी सेवा केंद्रांकडूनच बियाणे व खते खरेदी करावीत आणि खरेदीवेळी पक्के बिल अवश्य घ्यावे. कोणत्याही कृषी सेवा केंद्राकडून नियमांचे उल्लंघन होत असल्यास शेतकऱ्यांनी तक्रार करावी. तक्रारींसाठी तालुकानिहाय कृषी अधिकारी, गुणनियंत्रण व कृषी अधिकारी यांच्या संपर्क क्रमांकावर तसेच जिल्हास्तरीय ७६२७०३७४०८ या क्रमांकावर व्हॅटसअ‍ॅप द्वारे तक्रार करता येईल.

# MPSC पेपरफुटीचे धागेदोरे थेट मंत्रालयापर्यंत ?

मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातंर्गत औषध निरीक्षक पदाचा पेपर फुटला होता. याप्रकरणात एका मागून एक धक्कादायक खुलासे समोर येत आहे. अगोदर लव्ह अँगल नंतर हेट स्टोरी समोर आल्यानंतर आता थेट मंत्री नरहरी झिरळव यांच्या अन्न आणि औषधी मंत्रालयापर्यंत या पेपरफुटीचे धागेदोरे तर नाहीत ना? यादृष्टीने तपासाची चक्र फिरली आहेत. यामुळे मोठी खळबळ उडाली आहे. अगोदरच या मंत्रालयाची लाच प्रकरणात मोठी बदनामी झाली होती. आता पेपरफुटीप्रकरणातही या मंत्रालयाशी संबंधित एकाची चौकशी करण्यात आली आहे.एमपीएससी पेपरफुटी प्रकरणातील आरोपी गौरव पाटील यांच्या घरात मंत्री नरहरी झिरवळ यांचे विशेष कार्य अधिकारी गेल्या तीन वर्षांपासून भाडेकरू म्हणून राहत असल्याची माहिती समोर आली आहे. गणेश देवरे हे आरोपी गौरव पाटील यांच्या घरात राहत असल्याने पेपरफुटी प्रकरणाचे धागेदोरे थेट मंत्र्यांपर्यंत आहेत का ? अशी चर्चा सुरू झाली आहे. मंत्री नरहरी झिरवळ यांचे विशेष कार्य अधिकारी गणेश देवरे यांची मुंबई विशेष शाखेच्या पथकाकडून चौकशी करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

ज्या विभागाचा पेपर फुटला, त्याच विभागाच्या मंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी आरोपीच्या घरात भाडेकरू असल्याने अनेक संशय उपस्थित होत आहेत. गणेश देवरे हे गेल्या तीन वर्षांपासून आरोपी गौरव पाटील यांच्या घरात भाडेकरू म्हणून राहत असल्याची माहिती समोर आली आहे. गणेश देवरे हे कृषी विभागाच्या माध्यमातून मंत्री नरहरी झिरवळ यांच्याकडे विशेष कार्य अधिकारी म्हणून काम पाहत असल्याचे समजते.

एमपीएससी पेपरफुटी प्रकरणातील आरोपींच्या नातेवाईकांचा आणि परिचितांचा गोतावळा समोर येत असताना, गणेश देवरे यांचाही आरोपी गौरव पाटील यांच्याशी जवळचा संबंध असल्याची माहिती तपासादरम्यान समोर आली आहे. आरोपी ऋतुजा पाटील, अमृत पाटील, गौरव पाटील आणि मंत्री नरहरी झिरवळ यांचे विशेष कार्य अधिकारी गणेश देवरे हे सर्व नंदुरबारमधील एकाच कॉलनीतील रहिवासी असल्याने संशयाला बळ मिळाले आहे.

# आदिवासी विद्यार्थ्यांचे उपोषण मागे

## मुलीचा मृत्यू, कुटुंबीयांना ५ लाखांची मदत, ३ अधिकाऱ्यांचे निलंबन,




युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - नाशिकमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांनी सुरू केलेले उपोषण अखेर मागे घेण्यात येणार आहे. विद्यार्थिनीच्या मृत्यू प्रकरणी प्रशासनाने आज तीन अधिकाऱ्यांचे निलंबन केले आहे. तसेच पीडित विद्यार्थिनीच्या कुटुंबीयांना आदिवासी विकास विभागाकडून ५ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली आहे.

आदिवासी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा आज १७वा दिवस असून, उपोषणाचा १३वा दिवस आहे. प्रशासनाकडून देण्यात आलेली आश्वासने, तीन अधिकाऱ्यांवरील कारवाई आणि कुटुंबीयांना देण्यात आलेली आर्थिक मदत यानंतर आंदोलक विद्यार्थ्यांनी उपोषण मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. नाशिकचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद आणि पोलीस आयुक्त यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांकडून उपोषण मागे घेण्यात येणार आहे. मात्र, उपोषण मागे घेतले असले तरी आपल्या विविध मागण्यांसाठी आंदोलन सुरूच ठेवण्याची भूमिका आदिवासी विद्यार्थी आंदोलकांनी घेतली आहे.

नाशिक जिल्ह्यातील कळवण तालुक्यातील विसापूर येथील शासकीय आश्रमशाळेतील आदिवासी विद्यार्थिनी सृष्टी सूर्यवंशी हिच्या मृत्यूनंतर विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरू केले होते. विद्यार्थिनीची प्रकृती बिघडल्यानंतर तिला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. या घटनेनंतर आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या आरोग्य सुविधा, वेळेवर उपचार आणि प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित करण्यात आले. या प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, तसेच विद्यार्थ्यांच्या विविध मागण्या मान्य कराव्यात, यासाठी आदिवासी विद्यार्थ्यांनी नाशिकमध्ये आंदोलन सुरू केले होते. आज आंदोलनाचा १७वा, तर उपोषणाचा १३वा दिवस होता. प्रशासनाने तीन अधिकाऱ्यांचे निलंबन केले असून, मृत विद्यार्थिनीच्या कुटुंबीयांना आदिवासी विकास विभागाकडून ५ लाख रुपयांची आर्थिक मदत दिली. त्यानंतर आंदोलकांनी उपोषण मागे घेण्याचा निर्णय घेतला. मात्र इतर मागण्यांसाठी आंदोलन सुरूच ठेवण्याची भूमिका त्यांनी घेतली आहे.

# लोडशेडिंग विरोधात संगमनेरमध्ये काँग्रेस आक्रमक



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर-सध्या राज्यात पावसाने ओढ दिली आहे. शेतकरी, सर्वसामान्य नागरिक हवालदिल झाला आहे .त्यातच वीज वितरण विभागाने सुरू केलेल्या लोड शेडिंग मुळे सर्वत्र मोठी नाराजी वाढली असून ग्रामीण भागासह शहरातील विद्यार्थी व महिला त्रस्त आहेत. वीज वितरण विभागाने सायंकाळी सहा ते नऊ या वेळेत कोणतीही लोड शेडिंग न करता पूर्ण दाबाने वीज पुरवठा सुरूच ठेवावा या मागणीसह वीज वितरण विभागाच्या गलथान कारभार विरोधात काँग्रेसने आज आक्रमक धोरण घेतले.

महावितरण कार्यालयात आज काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी निवेदन दिले. यावेळी सौ. दुर्गाताई तांबे, पांडुरंग पाटील घुले, युवा काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ. जयश्रीताई थोरात तालुकाध्यक्ष अजय फटांगरे, शरद नाना थोरात, बुवाजी बाबा पुणेकर,कैलास पानसरे, रमेश गुंजाळ ,शिवाजी जगताप, विठ्ठल गुंजाळ, नरेंद्र गुंजाळ सिताराम राऊत, योगेश पोकळे, प्रभाकर गुंजाळ, रामकृष्ण लांडगे, संदीप डोंगरे, शकुंतला सोसे, रामेश्वर पानसरे, भारत शेलकर, दत्तू कोल्हे, शिवाजी खुळे, अलोक बर्डे, उज्वला राहणे, शीतल हासे, सदाशिव हासे, निखिल पापडेजा, शेखर सोसे, रवींद्र गिरी ,वैष्णव मुर्तडक ,राजू खरात, दत्तू कोकणे, तात्या कुटे यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, संगमनेर शहर व तालुक्यामध्ये दररोज सायंकाळी सहा ते नऊ या वेळेत लोड शेडिंग केली जाते. यामुळे अंधार पडत असताना विद्यार्थी घरी येण्याची वेळ असते .याच काळामध्ये हिंस्र प्राणी विद्यार्थ्यांवर हल्ले करतात. त्यापासून त्यांना मोठा धोका निर्माण होतो. याचबरोबर घरी आल्यानंतर लोड शेडींग मुळे विद्यार्थ्यांना अभ्यास करता येत नाही तसेच शेतकरी बांधवांना दूध काढणे गाई गोठ्याची साफसफाई करणे अशी अनेक कामे याच काळात करावी लागतात त्यामुळे या काळामध्ये कोणतीही लोड शेडिंग करू नये अशी मागणी त्यांनी केली सौ.दुर्गाताई तांबे म्हणाल्या की, येणारा काळ हा सणासुदीचा आहे गणपती उत्सव, देवीचा उत्सव या सर्व काळामध्ये नागरिक मोठे आनंदी असतात मात्र लोड शेडिंग केल्यामुळे त्यांच्या आनंदावर विरजण पडते सरकारची जबाबदारी आहे सरकारने वेळेत लाईट दिली पाहिजे. पूर्ण वेळ व पूर्ण दाबाने वीजपुरवठा सुरळीत करावा अशी आग्रही मागणी त्यांनी केली. तर पांडुरंग पाटील घुले म्हणाले की या सरकारने शेतकऱ्यांना पूर्णपणे मोफत वीज देण्याची घोषणा केली आहे. महायुतीचे सरकार हे फक्त घोषणाबाजी करत असून मोफत पूर्णवेळ व पूर्ण दाबाने राज्यभरात लाईट त्यांनी दिली पाहिजे. मात्र लोड शेडिंग करून शेतकऱ्यांना आणि सर्वसामान्य माणसाला त्रास देण्याचे काम हे सरकार करत आहे.

तर अजय फटांगरे म्हणाले की सरकारच्या योजना फसव्या असून तरुणाई आता रस्त्यावर उतरली आहे. केंद्र व राज्य सरकार फक्त खोट्या घोषणा करत आहे. महागाई बेरोजगारी वाढली आहे यावरून लक्ष विचलित करण्यासाठी धर्माचे आणि जातीचे राजकारण केले जात आहे. आता विकासाचे राजकारण गरजेचे असून वीजपुरवठा सुरळीत करा अन्यथा रस्ता रोको करून तीव्र आंदोलन छेडले जाईल असा इशारा त्यांनी दिला.

याप्रसंगी गोरक्षनाथ सातपुते ,शबीर तांबोळी ,सागर सोनवणे, श्रीकांत सांगळे, राधाकिसन नेहे ,सतीश वर्पे, यांच्यासह विविध कार्यकर्ते व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी महावितरण कार्यालयाच्या विरोधात कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी दिली.

# खासगीकरणाचा प्रश्न

## विकासाचा मार्ग की सरकारी जबाबदारीतून माघार?

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये गेल्या तीन दशकांत मोठे बदल झाले आहेत. १९९१ नंतर उदारीकरण, जागतिकीकरण आणि खासगीकरण या धोरणांना गती मिळाली. उद्योग, बँकिंग, दूरसंचार, विमानसेवा, शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधा यांसारख्या अनेक क्षेत्रांमध्ये खासगी गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यात आले. सरकारचा हस्तक्षेप कमी करून खासगी क्षेत्राला अधिक संधी देण्याच्या या प्रक्रियेला खासगीकरण असे म्हटले जाते. मात्र आजही खासगीकरणाबाबत मतमतांतरे आहेत. काहींच्या मते खासगीकरण हा विकासाचा प्रभावी मार्ग आहे, तर काहींच्या मते ही सरकारी जबाबदारीतून घेतलेली माघार आहे.




खासगीकरणाचे समर्थक असे सांगतात की खासगी क्षेत्र कार्यक्षम, गतिमान आणि स्पर्धात्मक असते. सरकारी यंत्रणेमध्ये अनेकदा लालफितशाही, निर्णय प्रक्रियेतील विलंब आणि प्रशासकीय अडथळे दिसून येतात. त्याउलट खासगी कंपन्या कमी वेळेत निर्णय घेतात आणि ग्राहकांना अधिक चांगल्या सेवा देण्याचा प्रयत्न करतात. भारतातील दूरसंचार क्षेत्र हे याचे उत्तम उदाहरण मानले जाते. खासगी कंपन्यांच्या आगमनानंतर मोबाईल सेवा स्वस्त, वेगवान आणि अधिक व्यापक झाल्या. इंटरनेट क्रांतीमुळे देशाच्या विकासालाही चालना मिळाली. खासगीकरणामुळे सरकारवरील आर्थिक भार कमी होतो, असा एक महत्त्वाचा युक्तिवाद केला जातो. तोट्यातील सार्वजनिक उपक्रम चालवण्यासाठी सरकारला मोठ्या प्रमाणात निधी खर्च करावा लागतो. हे पैसे शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा आणि सामाजिक कल्याण योजनांसाठी वापरले जाऊ शकतात. त्यामुळे काही क्षेत्रांमध्ये खासगी गुंतवणूक वाढल्यास सरकारला विकासाच्या इतर क्षेत्रांकडे अधिक लक्ष देता येते.

रोजगार निर्मितीच्या दृष्टीनेही खासगी क्षेत्राचे योगदान महत्त्वाचे मानले जाते. नवीन उद्योग, सेवा क्षेत्रातील विस्तार आणि तंत्रज्ञान आधारित व्यवसायांमुळे रोजगाराच्या संधी निर्माण होतात. स्पर्धेमुळे गुणवत्ता वाढते आणि ग्राहकांना अधिक पर्याय उपलब्ध होतात. त्यामुळे आर्थिक विकासाचा वेग वाढण्यास मदत होते. मात्र खासगीकरणाच्या विरोधकांचे म्हणणे वेगळे आहे. त्यांच्या मते काही क्षेत्रे ही केवळ नफा कमावण्याची साधने नसून ती नागरिकांच्या मूलभूत गरजांशी संबंधित आहेत. शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, वीज आणि सार्वजनिक वाहतूक यांसारख्या सेवांमध्ये सरकारची भूमिका महत्त्वाची आहे. जर या क्षेत्रांचे पूर्णपणे खासगीकरण झाले, तर सेवांचा खर्च वाढू शकतो आणि गरीब व वंचित घटकांना त्या सेवांपासून वंचित राहावे लागू शकते. आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रातील वाढत्या खासगीकरणामुळे निर्माण झालेल्या समस्या आज अनेक ठिकाणी दिसून येतात. चांगल्या शिक्षणासाठी लाखो रुपयांची फी भरावी लागते, तर गंभीर आजारांच्या उपचारांसाठी खासगी रुग्णालयांमध्ये प्रचंड खर्च येतो. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी या सेवा परवडण्याजोग्या राहत नाहीत. अशा वेळी सरकारची जबाबदारी अधिक महत्त्वाची ठरते. खासगीकरणामुळे रोजगार सुरक्षिततेवरही प्रश्नचिन्ह निर्माण होते. सरकारी नोकऱ्यांमध्ये असलेली स्थिरता, सामाजिक सुरक्षा आणि सेवा अटी खासगी क्षेत्रात अनेकदा मर्यादित असतात. नफ्याच्या निकषावर निर्णय घेतले जात असल्याने कर्मचारी कपात किंवा कंत्राटी पद्धतीला प्राधान्य दिले जाऊ शकते. त्यामुळे कामगारांच्या हक्कांबाबत चिंता व्यक्त केली जाते.

खरे पाहता, खासगीकरण हे स्वत:मध्ये ना पूर्णपणे चांगले आहे, ना पूर्णपणे वाईट. कोणत्या क्षेत्रात, किती प्रमाणात आणि कोणत्या अटींवर खासगीकरण केले जाते यावर त्याचे परिणाम अवलंबून असतात. ज्या क्षेत्रांमध्ये स्पर्धा आणि कार्यक्षमता वाढविण्याची गरज आहे, तेथे खासगी सहभाग उपयुक्त ठरू शकतो. मात्र नागरिकांच्या मूलभूत गरजांशी संबंधित क्षेत्रांमध्ये सरकारने आपली जबाबदारी झटकून चालणार नाही.

आजच्या काळात सार्वजनिक आणि खासगी क्षेत्र यांच्यातील संतुलित भागीदारी हीच सर्वात योग्य दिशा मानली जाते. सरकारने नियामक आणि संरक्षकाची भूमिका बजावताना खासगी क्षेत्राच्या कार्यक्षमतेचा लाभ समाजाला मिळवून दिला पाहिजे. त्याचवेळी सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचे संरक्षण करणेही आवश्यक आहे. एकूणच, खासगीकरण हा विकासाचा मार्ग ठरू शकतो, परंतु तो सरकारी जबाबदारीची जागा घेऊ शकत नाही. विकास, कार्यक्षमता आणि सामाजिक न्याय यांचा समतोल साधणारे धोरणच देशाच्या दीर्घकालीन प्रगतीसाठी उपयुक्त ठरेल. सरकार आणि खासगी क्षेत्र यांनी परस्परपूरक भूमिका निभावल्यासच सर्वसमावेशक आणि शाश्वत विकासाचे उद्दिष्ट साध्य होऊ शकते.

# पान १ वरून - मंगलवाद्यांचा नाद घुमू द्या, डीजेचा ...

त्यामुळे उत्सवाचा आनंद घेताना इतरांच्या आरोग्याचा, सुरक्षिततेचा आणि शांततेचा विचार करणे ही प्रत्येक नागरिकाची सामाजिक जबाबदारी आहे.

उत्सव साजरे करण्यासाठी डीजे आणि प्रचंड आवाज हाच एकमेव पर्याय नाही. उलट पारंपरिक मंगलवाद्ये, संबळ-ताशा, ढोल, पखवाज, टाळ-मृदंग, बँड तसेच पोवाडे आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून उत्सव अधिक अर्थपूर्ण आणि आपल्या संस्कृतीशी जोडलेले करता येऊ शकतात. त्यामुळे 'डीजे नको, मंगलवाद्य हवे' हा विचार केवळ एका उत्सवापुरता मर्यादित न ठेवता व्यापक जनचळवळीचे रूप घेण्याची गरज आहे.

संगमनेरसारख्या सांस्कृतिक आणि सामाजिक परंपरा जपणाऱ्या शहरात उत्सवांचा जल्लोष असावा; मात्र तो इतरांना त्रासदायक ठरू नये, हीच अपेक्षा आहे. उत्सव समित्या, सामाजिक संस्था, नागरिक आणि प्रशासन यांनी एकत्रितपणे ध्वनीप्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी पुढाकार घेतल्यास आनंदोत्सव अधिक शिस्तबद्ध आणि संस्कृतीला साजेसा होऊ शकतो.

मंगलवाद्यांचा नाद हा आपल्या परंपरेचा वारसा आहे; तर अनावश्यक डीजेचा गोंगाट ही टाळता येणारी सवय आहे. उत्सवांचा उत्साह कायम ठेवत संगमनेरला ध्वनीप्रदूषणमुक्त करण्यासाठी 'डीजेचा गोंगाट थांबवा, मंगलवाद्यांचा नाद घुमवा' हा संदेश प्रत्येकाने कृतीत उतरवण्याची गरज आहे.

# अहिल्यानगर जिल्हा दुष्काळ जाहीर करा

## शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या – नीलेश लंके

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - पावसाने दडी मारल्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्यासह राज्यातील अनेक भागांत दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. शासनाने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तातडीने दुष्काळ जाहीर करावा.



तसेच पावसाअभावी करपून व जळून गेलेल्या पिकांचे त्वरित पंचनामे करून संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी खासदार नीलेश लंके यांनी केली आहे.खा. लंके म्हणाले, जामखेड तालुक्यात शाळेच्या नवीन खोल्यांच्या उद्घाटन कार्यक्रमासाठी गेलो असताना, परिसरातील शेतशिवारातील पिकांची स्थिती प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळाली. यावेळी अनेक ठिकाणी पावसाअभावी पिके करपून गेल्याचे अत्यंत गंभीर चित्र दिसून आले. शेतकऱ्यांनी मोठ्या अपेक्षेने पेरणी करून बियाणे, खते, मशागत व इतर शेतीकामांवर मोठा खर्च केला आहे. मात्र, अपेक्षित पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांवर मोठे आर्थिक संकट कोसळले असल्याचे खासदार लंके यांनी म्हटले आहे. पावसाअभावी निर्माण झालेल्या परिस्थितीचे तातडीने सर्वेक्षण करून करपलेल्या पिकांचे पंचनामे करण्यात यावेत. मात्र, केवळ पंचनामे करून कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण करण्यात काहीही अर्थ नाही. पंचनामे झाल्यानंतर प्रत्यक्ष संकटग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळाली पाहिजे, अशी स्पष्ट भूमिका खासदार लंके यांनी मांडली. शेतकरी अत्यंत कठीण परिस्थितीतून जात आहे. शेतीवरील मोठा खर्च करूनही पिके हातातून जाण्याची वेळ त्याच्यावर आली आहे. त्यामुळे शासनाने विलंब न करता वास्तव परिस्थितीचा विचार करून शेतकऱ्यांना तात्काळ दिलासा द्यावा, असे खासदार लंके यांनी सांगितले. दुष्काळी परिस्थितीचा परिणाम केवळ पिकांवरच नव्हे, तर पशुधनावरही होण्याची शक्यता आहे. पाण्याची टंचाई आणि चाऱ्याचा प्रश्न गंभीर होण्यापूर्वीच शासनाने आवश्यक त्या उपाययोजना करणे गरजेचे आहे.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# जयहिंद लोकचळवळीच्या वतीने रविवार व सोमवारी बाल कला महोत्सव





युवावार्ता(प्रतिनिधी)-- संगमनेर - विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी प्रात्यक्षिकासह मातीकाम, पेंटिंग, ड्रोन ऑपरेटर प्रशिक्षण, वॉटर कलर, संगीत, झुम्बा डान्स यांसह विविध उपक्रमांनी सजलेल्या दोन दिवसीय बालकला महोत्सवाचे रविवार दिनांक ६ सप्टेंबर व सोमवार दिनांक ७ सप्टेंबर रोजी सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात क्रीडा संकुल येथे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती सौ दुर्गाताई तांबे यांनी दिली आहे.

याबाबत अधिक माहिती देताना सौ दुर्गाताई तांबे म्हणाल्या की महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात व माजी आमदार डॉ सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील युवक व विद्यार्थ्यांमधील असलेल्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी सातत्याने विविध उपक्रमांचे आयोजन केले जात आहे. यावर्षीही रविवार ६ सप्टेंबर व सोमवार ७ सप्टेंबर २०२६ रोजी सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात क्रीडा संकुल येथे रंगभरण स्पर्धा, मातीकाम ,कागदी फुले तयार करणे, थ्रीडी पेंटिंग ,प्रशिक्षण वर्ग, डूडल आर्ट, कॅलिग्राफी ,बाहुली काम ,म्युझियम, झुम्बा डान्स स्टील ऑन विल प्रशिक्षण असे विविध उपक्रम असलेल्या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

या महोत्सवाचे उद्घाटन रविवारी सकाळी ९ वा काँग्रेस नेते माजी शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या शुभहस्ते व माजी आमदार डॉ सुधीर तांबे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. यावेळी आमदार सत्यजित तांबे, डॉ.जयश्रीताई थोरात, नगराध्यक्ष डॉ.मैथिलीताई तांबे, उपनगराध्यक्ष नूर मोहम्मद शेख यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या तालुकास्तरीय बालकला महोत्सवातील रंगभरण स्पर्धेमध्ये इयत्ता पहिली व दुसरी मधील विद्यार्थ्यांसाठी एक ते पाच क्रमांकापर्यंत उत्तेजनार्थ ५०० रुपयांचे बक्षीस तिसरी व चौथी मधील विद्यार्थ्यांकरता ३०० रुपये बक्षीस पाचवी ते सहावी एक ते पाच क्रमांकासाठी उत्तेजनार्थ २५० रुपये बक्षीस सातवी ते आठवी एक ते पाच क्रमांक उत्तेजनार्थ साठी दोनशे रुपये बक्षीस आणि नववी ते दहावी एक ते पाच क्रमांकासाठी १५० रुपये बक्षीस दिले जाणार आहे सर्व विद्यार्थ्यांना प्रवेश मोफत आहे.

तरी या रंगभरण स्पर्धा व बाल महोत्सवांमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा असे आवाहन प्रकाश पारखे, चांगदेव खेमनर ,सुनील कवडे ,संजय मासाळ ,राजू गोरे ,संजय सोनवणे, मिनीनाथ जोर्वेकर, दत्ता बटवाल विकास भालेराव यांच्यासह जयहिंद लोकचळवळीच्या वतीने व संगमनेर तालुका कला शिक्षक संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

## ज्ञानदानासारखे जगात मोठे काहीच नाही - प्रा. चं. का. देशमुख

# मालपाणी विद्यालयात शिक्षकदिन उत्साहात साजरा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : येथील मालपाणी विद्यालयात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन शिक्षक दिन म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने इयत्ता नववीतील ६० विद्यार्थ्यांनी एक दिवसासाठी मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भूमिका स्वीकारत शालेय कामकाजाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.

कार्यक्रमास ज्येष्ठ शिक्षक प्रा . चं. का. देशमुख, पालक प्रतिनिधी प्रा . डॉ. उत्तमराव खर्डे, मुख्याध्यापक उत्तम एरंडे, पर्यवेक्षिका रंजना पवार, विद्यार्थी मुख्याध्यापक अनिमिष मिलिंद पंडित, विद्यार्थी पर्यवेक्षिका प्रेरणा सचिन भुतकर आदी उपस्थित होते. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

अर्णव शांताराम आंबरे याने प्रास्ताविक केले. आरती कुलकर्णी यांनी परिचय व सत्कार करून दिला. यावेळी विद्यार्थी शिक्षक अर्णव अनिल दणदणे व श्रद्धा ब्रिजेशकुमार यादव यांनी मनोगत व्यक्त केले.

ज्येष्ठ शिक्षक प्रा देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, विद्यार्थ्यांनो, तुमच्यामध्ये खूप सामर्थ्य आहे. याची तुम्ही वेळीच साधना करा. ज्ञानासारखे दुसरे जगात मोठे काहीच नाही. सभाधीटपणे प्रश्न विचारून आपले विचार व्यक्त करा, असा संदेश दिला. शिक्षक दिनानिमित्त भूमिका बजावणाऱ्या सर्व ६० विद्यार्थी शिक्षकांना संत गाडगेबाबा प्रतिष्ठानच्या वतीने डायरी व पेन भेट देऊन त्यांचा उत्साह वाढविला.

पालक प्रतिनिधी डॉ. खर्डे यांनी विद्यार्थी शिक्षकांचे कौतुक करत, भविष्यात तुम्हाला जे बनायचे आहे, जे स्वप्न प्रत्यक्षात उतरवायचे आहे, त्यासाठी प्रयत्न व कठोर मेहनत करण्याची सुरुवात आजपासूनच करा, असे आवाहन केले. त्यांनी डॉ. राधाकृष्णन यांच्या जीवनकार्याची माहिती देत चित्रकार, गुरु आणि चित्रावरील काळा डाग यांची प्रबोधनात्मक गोष्ट सांगितली.

मुख्याध्यापक एरंडे यांनी शिक्षक दिनाच्या जुन्या आठवणींना उजाळा देत, शाळेत असताना आम्हीही शिक्षक दिनी शिक्षक झालो होतो. चं. का. देशमुख सर आम्हाला शिक्षक होते, असे सांगितले. विद्यार्थी शिक्षकांना प्रभावीपणे अध्यापन कसे करावे, याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. शिक्षक हा असा व्यक्ती आहे की ज्याचा संपर्क जिवंत, सजीव व्यक्तीशी येतो, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैभवी सोमनाथ आरसिद्ध व अनन्या सचिन फटांगरे यांनी केले, तर आयुष शिवदास थोरबोले याने आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी इयत्ता नववीच्या वतीने विनायक हिरे, वैशाली कोल्हे व अश्विनी चकोर यांनी परिश्रम घेतले.

# सायखिंडीत उमाजी नाईकांच्या शौर्याचा जागर

## प्रा. नितीन बानगुडे-पाटील यांच्या प्रखर व्याख्यानाची पर्वणी



युवावार्ता (प्रतिनिधी)

सायखिंडी - परकीय सत्तेविरुद्ध स्वाभिमानाची मशाल पेटवून अन्याय, शोषण आणि गुलामगिरीविरोधात बंडाचे रणशिंग फुंकणारे आद्यक्रांतीवीर राजे उमाजी नाईक यांच्या २३५ व्या जयंतीनिमित्त सायखिंडी येथे भव्य जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार, दि. ७ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता हनुमान मंदिरासमोर हा प्रेरणादायी सोहळा रंगणार आहे.

या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण सुप्रसिद्ध इतिहास अभ्यासक, लेखक, प्राध्यापक व शिवव्याख्याते प्रा. नितीन बानगुडे-पाटील यांचे प्रखर व्याख्यान ठरणार आहे. आपल्या ओजस्वी वाणीने इतिहासातील पराक्रम, शौर्य आणि संघर्षाची गाथा वर्तमानाशी जोडून युवकांच्या मनात स्वाभिमान, राष्ट्रनिष्ठा व सामाजिक बांधिलकी निर्माण करणारे विचार ते यावेळी मांडणार आहेत.

राजे उमाजी नाईक यांनी इंग्रज सत्तेच्या अन्यायाविरुद्ध संघटित प्रतिकार उभा केला. डोंगर-दऱ्यांतील धाडसी तरुणांना एकत्रित करून त्यांनी गनिमी कावा, नियोजन आणि शौर्याच्या जोरावर ब्रिटिश सत्तेला आव्हान दिले. त्यांचा संघर्ष हा केवळ परकीय सत्तेविरोधातील लढा नव्हता, तर अन्याय, शोषण आणि गरिबांच्या प्रश्नांविरोधातील लोकलढाही होता.

आजच्या पिढीने जयंती केवळ उत्सव म्हणून न साजरी करता उमाजी नाईकांचे शौर्य, स्वाभिमान, संघटनकौशल्य आणि लोककल्याणाची भावना आत्मसात करावी, हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

या कार्यक्रमाचे आयोजन म महेशभाऊ गोफणे, नितीनभाऊ बोऱ्हाडे व राजे उमाजी नाईक उत्सव समिती, सायखिंडी यांच्या वतीने करण्यात आले आहे. नागरिक, युवक, विद्यार्थी व इतिहासप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या ऐतिहासिक व प्रेरणादायी सोहळ्याची साक्षीदार व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# एलआयसीच्या ७० व्या वर्धापन दिनानिमित्त सिद्धार्थ विद्यालयात वृक्षारोपण उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : भारतीय आयुर्विमा महामंडळाच्या (एलआयसी) ७०व्या वर्धापन दिनानिमित्त एलआयसीच्या संगमनेर शाखेच्या वतीने सिद्धार्थ विद्यालयाच्या प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी विद्यालयाच्या परिसरात विविध दहा फळझाडांची लागवड करण्यात आली.

यावेळी बोलताना एलआयसी संगमनेर शाखेचे व्यवस्थापक जयप्रकाश देकाटे म्हणाले की, गेल्या ७० वर्षांपासून एलआयसीने 'जीवन के साथ भी, जीवन के बाद भी' हे ब्रीदवाक्य प्रत्यक्षात उतरवत भारतीय नागरिकांच्या जीवनात आर्थिक सुरक्षिततेबरोबरच समृद्धीची भावना निर्माण केली आहे. आर्थिक संचयातून भविष्यातील सुरक्षितता निर्माण होते तसेच जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन विकसित होतो. देकाटे यांनी विद्यार्थ्यांना एलआयसीच्या पोर्टलवर इयत्ता दहावीपासून पदव्युत्तर शिक्षणापर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या विविध शैक्षणिक सुविधा व शिष्यवृत्ती योजनांची माहिती दिली. तसेच वृक्षांचे मानवी जीवनातील महत्त्व स्पष्ट करून लावण्यात आलेल्या झाडांचे विद्यार्थ्यांनी संवर्धन करावे, असे आवाहन केले.

याप्रसंगी सिद्धार्थ विद्यालयातील संगणक कक्षाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. शिक्षक आमदार किशोर दराडे यांनी विद्यालयाला एलसीडी प्रोजेक्टर भेट दिला असून, त्यामाध्यमातून विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अध्ययनाची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मुख्याध्यापक रघुनाथ जगताप यांनी त्यांचे आभार मानले. एलआयसीच्या वतीने इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना रंगकामाचे साहित्य देऊन चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रकाश पारखे, बाळासाहेब राऊत, तुषार थिटे, गर्जना गांगुर्डे, सीमा वाघ, दत्तात्रय गोफणे, सुशांत रूपवते, नंदकुमार भालारे, सुनील यादव व आलेस पंडित यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रकाश पारखे यांनी केले.

# रामकुंडात पाच पर्यटक बुडाले !

युवावार्ता प्रतिनिधी)

नाशिक - नाशिकच्या प्रसिद्ध रामकुंड परिसरातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. रामकुंड परिसरातील चक्रधर स्वामी मंदिराजवळ गोदावरी नदीत पोहण्यासाठी उतरलेल्या मुंबई येथील पर्यटकांच्या गटातील तब्बल पाच जण पाण्यात बुडाल्याची घटना शनिवारी घडली आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, पर्यटक नाशिकमध्ये फिरण्यासाठी आले होते. यावेळी रामकुंड परिसरात आल्यानंतर काही पर्यटक गोदावरी नदीपात्रात पोहण्यासाठी उतरले. मात्र, पाण्याची खोली आणि नदीतील प्रवाहाचा अंदाज न आल्याने पाच जण अचानक पाण्यात बुडाले. घटनेचं गांभीर्य लक्षात घेऊन बचाव पथकांनी कोणताही वेळ न दवडता नदीपात्रात शोध आणि बचावकार्य सुरू केलं.

# डॉ. भानुदासजी डेरे इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये दहीहंडी सोहळा उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर - येथील नामांकित शिक्षण संस्था डॉ. भानुदास जी डेरे इंग्लिश मिडीयम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजमध्ये श्रीकृष्ण जन्मोत्सव तथा गोकुळाष्टमीचा सण मोठ्या उत्साहात, भक्तिमय वातावरणात आणि पारंपरिक जल्लोषात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध कलागुणांसह मुला-मुलींच्या दहीहंडी पथकांनी उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती सौ. अंकिता श्रीराज डेरे पाटील यांची होती. मान्यवरांच्या हस्ते भगवान श्रीकृष्णाच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. यानंतर विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण जन्मोत्सवानिमित्त सुंदर भजने व गीते सादर केली. छोट्या विद्यार्थ्यांनी राधा-कृष्णाच्या वेशभूषा परिधान करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण म्हणजे दहीहंडीचा थरार. यंदाच्या दहीहंडीचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे शाळेत दोन स्वतंत्र दहीहंडींचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये मुलांच्या पथकाने शिस्तबद्ध मानवी मनोरे रचत पहिली हंडी फोडली, तर मुलींच्या पथकानेही तितकाच अफाट उत्साह आणि समन्वय दाखवत दुसरी हंडी यशस्वीरीत्या फोडली. 'गोविंदा रे गोपाळा'च्या जयघोषाने आणि ढोल-ताशांच्या तालावर संपूर्ण परिसर दणाणून गेला होता.

दहीहंडीनंतर विद्यार्थ्यांनी विविध पारंपरिक आणि भक्तीगीतांवर बहारदार नृत्यकला सादर केली. नृत्याविष्कार आणि सांस्कृतिक कार्यक्रमांतून विद्यार्थ्यांनी भारतीय सण व संस्कृतीचे सुंदर दर्शन घडवले.

याप्रसंगी संगम सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष डॉ. भानुदास जी. डेरे, उपाध्यक्ष ड श्रीराज डेरे पाटील, संचालिका सौ. अंकिता श्रीराज डेरे पाटील, प्राचार्य सुनीलकुमार शुक्ला, उपप्राचार्य (प्राथमिक) सौ. हरजिंदर कौर तसेच सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन शाळेच्या सांस्कृतिक व क्रीडा विभागामार्फत करण्यात आले. भारतीय संस्कृती व परंपरांचे जतन व्हावे आणि विद्यार्थ्यांमध्ये संघभावना वाढीस लागावी या उद्देशाने आयोजित करण्यात आलेला हा सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला.

# नाशिक-पुणे सेमी हायस्पीड रेल्वेसाठी अकोलेकरांचा एल्गार; तहसीलदारांना निवेदन



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - नाशिक-पुणे सेमी हायस्पीड रेल्वे मार्ग मूळ संकल्पित मार्गानेच करण्यात यावा, या मागणीसाठी अकोले तालुका रेल्वे कृती समिती आणि अकोले तालुका ग्राहक पंचायतीच्या वतीने तहसीलदार डॉ. सिद्धार्थ मोरे यांना शुक्रवारी निवेदन देण्यात आले. या मागणीसाठी परिसरातील नागरिकांनी शासनाचे लक्ष वेधले असून, रेल्वे प्रकल्पाबाबत ठोस निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली आहे.

नाशिक, पुणे आणि अहिल्यानगर या तीन जिल्ह्यांतील रेल्वे कृती समितीची बैठक राजगुरुनगर येथे नुकतीच पार पडली. या बैठकीत नाशिक-पुणे सेमी हायस्पीड रेल्वे मार्गाच्या प्रश्नावर सविस्तर चर्चा करण्यात आली. नारायणगाव येथील खोडद परिसरातील जागतिक जी.एम.आर.टी. प्रकल्पामुळे रेल्वे मार्गाच्या कामात अडचणी येत असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे रेल्वे मार्गाबाबत विविध स्तरावर चर्चा सुरू आहे.

या प्रश्नावर वेळोवेळी आंदोलने करण्यात आली. त्यानंतर शासनाने पर्यायांचा अभ्यास करण्यासाठी ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली. समितीने अहवाल दिल्यानंतर ६० दिवसांत निर्णय घेण्यात येईल, असे सांगण्यात आले होते. मात्र, त्यानंतरही अपेक्षित निर्णय झालेला नसल्याने रेल्वे कृती समितीने नाराजी व्यक्त केली आहे.

विशेष म्हणजे, समिती स्थापन होऊन ३५ दिवसांचा कालावधी उलटूनही अद्याप जनसुनावणी झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला. तसेच सात तालुक्यांतील प्रत्येक गावात जाऊन नागरिकांची मते जाणून घेण्याचे ठरले होते. मात्र, या प्रक्रियेलाही अपेक्षित वेग मिळत नसल्याने नागरिकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे.

नाशिक-पुणे महामार्गावरील सातही तालुक्यांच्या तहसीलदारांना निवेदन देण्याचा निर्णय कृती समितीच्या बैठकीत घेण्यात आला. त्यानुसार अकोले तालुका रेल्वे कृती समिती व ग्राहक पंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी तहसीलदारांना निवेदन देत शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी केली. यावेळी आनंद वाकचौरे, आप्पासाहेब आवारी, भाऊसाहेब वाकचौरे, मच्छिंद्र मंडलिक, जगदीश चौधरी, माधव तिटमे, प्रदीप हासे, महेश नवले, ज्ञानेश पुंडे, राम खुळे, रामदास पांडे, वसंत बाळसराफ, अजित हासे यांच्यासह विविध नागरिक उपस्थित होते.

## संपादकीय...

# राजकारणातील कटुता लोकशाहीसाठी घातक

लोकशाही म्हणजे केवळ निवडणुका, मतदान आणि सत्तेची अदलाबदल नव्हे. लोकशाहीचा खरा आत्मा मतभिन्नतेचा आदर, संवाद, सहिष्णुता आणि विरोधकांच्या अस्तित्वाचा स्वीकार यात आहे. सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात मतभेद असणे हे लोकशाहीचे सौंदर्य आहे; मात्र हे मतभेद जेव्हा वैयक्तिक द्वेष, अपमान, आरोप-प्रत्यारोप आणि सूडाच्या राजकारणात रूपांतरित होतात, तेव्हा लोकशाहीच्या आरोग्यावर प्रश्नचिन्ह निर्माण होते. आज भारतीय राजकारणात वाढत चाललेली राजकीय कटुता ही निश्चितच चिंतेची बाब आहे.

पूर्वी राजकीय पक्षांमध्ये तीव्र वैचारिक मतभेद असायचे. सभागृहात एकमेकांच्या धोरणांवर कठोर टीका केली जायची. निवडणुकीत एकमेकांविरोधात प्रचारही केला जायचा. मात्र निवडणूक संपल्यानंतर वैयक्तिक संबंध कायम ठेवण्याची राजकीय संस्कृती मोठ्या प्रमाणावर दिसत होती. आज मात्र राजकीय संघर्ष अनेकदा व्यक्तीविरोधात केंद्रित होताना दिसतो. विरोधकांच्या धोरणांवर टीका करण्याऐवजी त्यांच्या वैयक्तिक आयुष्यावर, कुटुंबावर, चारित्र्यावर आणि प्रतिष्ठेवर प्रश्न उपस्थित केले जातात. ही प्रवृत्ती लोकशाहीच्या संस्कृतीला कमकुवत करणारी आहे. सोशल मीडिया आणि २४ तासांच्या वृत्तवाहिन्यांमुळे राजकीय वाद अधिक तीव्र झाले आहेत. एखाद्या नेत्याचे विधान काही मिनिटांत देशभर पोहोचते आणि त्यावर प्रतिक्रिया देण्याची स्पर्धा सुरू होते. विचार करण्यापूर्वी प्रतिक्रिया आणि तथ्य तपासण्यापूर्वी आरोप अशी परिस्थिती निर्माण होत आहे. राजकीय पक्षांचे समर्थकही सोशल मीडियावर एकमेकांवर आक्रमक भाषेत टीका करतात. परिणामी राजकीय मतभेद वैयक्तिक शत्रुत्वात बदलतात. याचा सर्वात मोठा परिणाम जनतेवर होतो. नागरिकांनी कोणत्या पक्षाला मतदान करावे, कोणाचे धोरण योग्य आहे, कोणाचा विकासाचा दृष्टिकोन चांगला आहे, यावर चर्चा होणे अपेक्षित आहे. परंतु प्रत्यक्षात निवडणुकीच्या काळात रोजगार, महागाई, शेती, शिक्षण, आरोग्य, पाणी, रस्ते, उद्योग यांसारखे मूलभूत प्रश्न मागे पडतात आणि 'कोण कोणाला हरवणार?' हा प्रश्न केंद्रस्थानी येतो. राजकारण जर केवळ व्यक्ती आणि पक्षांच्या संघर्षाभोवती फिरू लागले, तर जनतेच्या प्रश्नांचे काय? राजकीय कटुतेचा आणखी एक गंभीर परिणाम म्हणजे प्रशासनावर होणारा परिणाम. सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात संवादच राहिला नाही, तर अनेक महत्त्वाचे निर्णय राजकीय संघर्षात अडकतात. विकासकामांना विरोध केवळ राजकीय कारणांसाठी केला जात असेल किंवा सत्ताधारी प्रत्येक टीकेला विरोध म्हणून पाहत असतील, तर नुकसान शेवटी जनतेचेच होते. लोकशाहीत विरोधकांचे काम सत्तेला अडथळा आणणे नसून सत्तेवर नियंत्रण ठेवणे, प्रश्न विचारणे आणि पर्यायी धोरण मांडणे हे आहे. विरोधकांना शत्रू समजण्याची मानसिकता धोकादायक आहे. राजकीय विरोधक हा देशाचा किंवा समाजाचा शत्रू नसतो; तो वेगळे मत मांडणारा लोकशाहीतील भागीदार असतो. त्याचे मत चुकीचे असू शकते, त्याच्या धोरणावर कठोर टीका करता येते; पण त्याचा आवाज दाबण्याचा प्रयत्न लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांच्या विरोधात आहे. त्याचप्रमाणे सत्ताधाऱ्यांवर प्रश्न विचारणे म्हणजे देशविरोधी भूमिका नव्हे. उलट प्रश्न विचारणारा नागरिक आणि विरोधक ही सुदृढ लोकशाहीची ताकद असते. राजकीय भाषेची पातळी घसरत जाणे हीदेखील गंभीर बाब आहे. नेत्यांनी समाजाला दिशा द्यायची असते. त्यांच्या वक्तव्यांचा प्रभाव लाखो कार्यकर्त्यांवर आणि नागरिकांवर पडतो. त्यामुळे सार्वजनिक जीवनातील व्यक्तींनी संयमित भाषा वापरण्याची अधिक जबाबदारी स्वीकारली पाहिजे. नेत्यांनी जर शिवराळ भाषा वापरली, तर समर्थकांकडून संयमाची अपेक्षा कशी करणार? याचबरोबर माध्यमांची भूमिकाही महत्त्वाची आहे. राजकीय संघर्षातील सनसनाटी विधानांना अधिक प्रसिद्धी मिळते, तर धोरणात्मक चर्चेला तुलनेने कमी स्थान मिळते. त्यामुळे माध्यमांनीही 'कोण काय म्हणाले?' यापलीकडे जाऊन 'याचा जनतेला काय फायदा किंवा तोटा?' हा प्रश्न विचारण्याची गरज आहे. राजकीय पक्षांनीही आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. निवडणुकीत विजय मिळवण्यासाठी आक्रमक प्रचार आवश्यक असू शकतो; पण लोकशाही टिकवण्यासाठी संवाद आवश्यक आहे. सत्ताधारी पक्षाने विरोधकांचे म्हणणे ऐकले पाहिजे आणि विरोधकांनीही प्रत्येक सरकारी निर्णयाला केवळ राजकीय विरोध म्हणून विरोध न करता सकारात्मक पर्याय दिला पाहिजे. टीका हवी, पण तर्कासह; संघर्ष हवा, पण मुद्द्यांवर; विरोध हवा, पण वैर नको. लोकशाहीची खरी कसोटी निवडणुकीच्या दिवशी होत नाही. ती निवडणुकीनंतर होते-जेव्हा विजेता नम्रपणे सत्ता स्वीकारतो, पराभूत पक्ष जनतेचा कौल मान्य करून रचनात्मक विरोध करतो आणि दोन्ही बाजू जनहितासाठी एकत्र काम करण्यास तयार होतात. राजकीय मतभेद कायम राहणार आहेत आणि ते असणेही आवश्यक आहे. पण त्या मतभेदांना द्वेषाची किनार मिळता कामा नये.

# बालगोपाळांच्या मनमोहक सादरीकरणाने रंगला दहीहंडी सोहळा

युवावार्ता (प्रतिनिधी)

श्री वेंकटेश एज्युकेशन सोसायटी संचलित स्ट्रॉबेरी इंग्लिश मीडियम स्कूल येथे श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्सव मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. विविध सांस्कृतिक कार्यक्रम, श्रीकृष्णाच्या बाललीलांचे सादरीकरण, राधा-कृष्ण नृत्य आणि दहीहंडी सोहळ्यामुळे संपूर्ण शाळेचा परिसर कृष्णमय झाला.



संस्थेच्या संस्थापिका डॉ. सौ. संज्योत वैद्य मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली व प्राचार्य रमेश दिघे सर यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

कार्यक्रमाची सुरुवात भगवान श्रीकृष्णाच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी श्रीकृष्णाच्या जीवनातील विविध प्रसंगांवर आधारित सुंदर नृत्य, गीत, नाटिका व मनमोहक सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. श्रीकृष्ण, राधा, गोप-गोपी यांच्या पारंपरिक वेशभूषेतील चिमुकल्या बालगोपालांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

श्रीकृष्णाचा जन्म, बाललीला, माखनचोरी, कालियामर्दन, गोवर्धन पर्वत व रासलीला यांसारखे प्रसंग विद्यार्थ्यांनी आपल्या अभिनयातून जिवंत केले. विद्यार्थ्यांच्या निरागस अभिनयाला आणि आकर्षक वेशभूषेला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली.

जन्माष्टमीच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती, परंपरा आणि भगवान श्रीकृष्णाच्या जीवनातील मूल्यांची ओळख व्हावी, हा कार्यक्रमामागील प्रमुख उद्देश होता. श्रीकृष्णाने दिलेला कर्म, कर्तव्य, सत्य, धैर्य आणि सदाचाराचा संदेश विद्यार्थ्यांनी आपल्या सादरीकरणातून प्रभावीपणे मांडला.

कार्यक्रमाचा विशेष आकर्षणबिंदू ठरला तो दहीहंडी सोहळा. पारंपरिक वेशभूषेत सजलेल्या बालगोपालांनी मोठ्या उत्साहात दहीहंडी फोडली. गोविंदा आला रे आलाच्या जयघोषाने शाळेचा परिसर दुमदुमून गेला. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि उत्साह पाहण्यासारखा होता.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देत भारतीय संस्कृती आणि परंपरांची जपणूक करण्याचा सुंदर संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

याप्रसंगी संस्थापिका डॉ. सौ. संज्योत वैद्य मॅडम व प्राचार्य रमेश दिघे सर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

भक्ती, संस्कृती, कला आणि बालसुलभ उत्साहाचा सुरेख संगम घडविणारा हा जन्माष्टमी सोहळा विद्यार्थ्यांसह सर्वांसाठी आनंददायी आणि अविस्मरणीय ठरला.

# साईराजच्या यशाने चंदनापुरीच्या शाळेचा नावलौकिक वाढला

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, चंदनापुरी येथील विद्यार्थी साईराज विकास पावसे याने आपल्या गुणवत्तेची आणि मेहनतीची छाप उमटवत जिल्हास्तरीय परीक्षेत ३२६ वी रँक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले. त्याने २३४ गुण मिळवत आपल्या शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेत मानाचा तुरा रोवला आहे.



साईराज हा विकास पावसे व सौ. निशा पावसे यांचा सुपुत्र आहे. त्याच्या या यशामागे त्याची सातत्यपूर्ण मेहनत, जिद्द आणि अभ्यासातील सातत्य यासोबतच शाळेतील शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. वर्गशिक्षिका अनिता मालुंजकर, राहुल रोकडे तसेच मुख्याध्यापिका वंदना सातपुते यांच्या मार्गदर्शनाखाली साईराजने आपल्या अभ्यासात सातत्य ठेवले. शाळेतील सर्व शिक्षकवृंदानेही त्याला वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन केले.

साईराजच्या या यशाबद्दल चंदनापुरी ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच व सर्व सदस्य, विविध संस्थांचे पदाधिकारी, तसेच शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्य यांनी त्याचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

तसेच संगमनेर तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी बाळासाहेब गुंड, शिक्षण विस्तार अधिकारी नंदा वलवे आणि केंद्रप्रमुख रुपेश वाकचौरे यांनीही साईराजच्या यशाचे कौतुक केले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्येही गुणवत्तेची कमतरता नसून योग्य मार्गदर्शन, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि कुटुंबाचा पाठिंबा मिळाल्यास ते मोठे यश संपादन करू शकतात, हे साईराजने आपल्या कामगिरीतून सिद्ध केले आहे. त्याच्या या यशाबद्दल चंदनापुरी परिसरातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# वीरगावात वाडी-वस्त्यांवरील वीज गायब

## ग्रामस्थांचे महावितरण अधिकाऱ्यांना निवेदन

युवावार्ता (प्रतिनिधी)

वीरगाव परिसरातील विविध वाडी-वस्त्यांवर गेल्या काही दिवसांपासून वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. विजेच्या अनियमित पुरवठ्यामुळे नागरिकांसह शेतकरी, विद्यार्थी आणि व्यावसायिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

वीजपुरवठा सुरळीत करण्याच्या मागणीसाठी ग्रामस्थांनी महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. वाडी-वस्त्यांवरील वीजपुरवठा वारंवार खंडित होण्याबरोबरच अनेक ठिकाणी कमी दाबाने वीज मिळत असल्याने घरगुती उपकरणे तसेच शेतीपंपांवरही परिणाम होत असल्याचे ग्रामस्थांनी निवेदनात नमूद केले.

वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर तक्रार करूनही तातडीने दुरुस्ती होत नसल्याने नागरिकांना रात्रभर अंधारात राहण्याची वेळ येत आहे. शेतीच्या कामांसाठी वीज अत्यावश्यक असताना वीजपुरवठ्याच्या या समस्येमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली. महावितरणने वीरगाव परिसरातील वाडी-वस्त्यांवरील वीजपुरवठ्याची तातडीने पाहणी करून आवश्यक दुरुस्तीची कामे करावीत, तसेच भविष्यात वारंवार वीजपुरवठा खंडित होणार नाही यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. यावेळी परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. महावितरण अधिकाऱ्यांनी समस्या सोडविण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

# नाशिकच्या म्हाडा घोटाळ्यात मोठी कारवाई

नाशिक - नाशिकमधील बहुचर्चित सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेतील घोटाळ्याच्या चौकशीला आता वेग आला आहे. या प्रकरणाच्या तपासात एकापाठोपाठ एक धक्कादायक बाबी समोर येत असून, सकृतदर्शनी सहभाग आढळल्याने महसूल आणि भूमी अभिलेख विभागातील तब्बल १३ अधिकारी-कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. आता या प्रकरणाची चौकशी नाशिक महापालिकेच्या नगररचना विभागापर्यंत पोहोचली असून, १५ हून अधिक अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कारवाईची टांगती तलवार असल्याची माहिती समोर येत आहे. नाशिक महापालिका क्षेत्रात २० टक्के म्हाडा आरक्षणाच्या अंमलबजावणीमध्ये झालेल्या कथित अनियमिततेची चौकशी करण्यासाठी शासनाने विशेष समिती अर्थात एसआयटी स्थापन केली होती. या समितीने चौकशी करून अहवाल शासनाकडे सादर केल्याचं सांगितलं जात आहे.

**सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना लि., अमृतनगर**

पोस्ट-संगमनेर एस. के.-४२२६०८, ता. संगमनेर, जि. अ. नगर
फोन-०२४२५-२२९२००, २२५३७० मो.नं. ९८८११२५३९९
E-mail:amrutsugar@yahoo.co.in, Website:www.thoratsugar.com

जावक नंबर : सभाथोससाका/एम.बी./जनरल/२१६१/२०२६ दिनांक :- ०२/०९/२०२६

अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**(फक्त सभासदांसाठी)**

महाशय,

**सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना लिमिटेड, अमृतनगर, तालुका - संगमनेर, जिल्हा - अहिल्यानगर** या संस्थेची सन २०२५-२०२६ या वर्षाची 'अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा' **शुक्रवार दिनांक १८/०९/२०२६ रोजी दुपारी ठिक १.०० वाजता** कारखाना कार्यस्थळावरील अमृतेश्वर मंदिराचे समोरील प्रांगणात कारखान्याचे विद्यमान **चेअरमन मा. आ. बाळासाहेब भाऊसाहेब थोरात, मा. मंत्री, महसूल, महाराष्ट्र राज्य, मुंबई** यांच्या अध्यक्षतेखाली, खालील विषयांचा विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केलेली आहे. तरी सदर सभेत वर निर्दिष्ट केलेल्या तारखेस व वेळेस आपण उपस्थित राहावे, ही नम्र विनंती.

सभेपुढे येणारे विषय व विशेष सुचना कारखान्याच्या अधिकृत वेबसाईट www.thoratsugar.com वर पाहावयास मिळतील.

कळावे,

**मा. संचालक मंडळाच्या आदेशान्वये,**
**जगन्नाथ भाऊराव घुगरकर**
**कार्यकारी संचालक,**
**सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना लिमिटेड, अमृतनगर**


**पाहिजेत**
ऑफिस बॉय (प्युन)
शिक्षणास प्राधान्य
कॉम्प्युटर ज्ञान,
स्वत:चे वाहन आवश्यक
- संपर्क -
8378956909
8459199913
बायोडाटा पाठवा

**पाहिजेत**
कॉम्प्युटर ऑपरेटर - ४
अकाऊंटंट - २
सेल्समन - ५
(इन्सेंटीव्ह दिला जाईल)
आकर्षक पगार दिले जाईल
9822097904
9404971697
भेटण्याची वेळ (सायं ४ ते ७)

**पाहिजेत**
मेडिकल दुकानासाठी
महिला व मुले पाहिजे
प्रभात मेडिकल
नवीन नगर रोड,
ताजने मळी, संगमनेर
- संपर्क -
9921245753

**जागा विकणे आहे**
अतिशय उत्तम लोकेशन मधील मालदाड रोड, स्टेट बँक कॉलनी लगतची तहसील N. A. व सरकारी मोजीणी झालेली २ गुंठे उत्तरमुखी रहिवाशी चौरस जागा विकणे आहे.
एजंट स्वागत
- संपर्क -
9890468212

**पाहिजेत**
सोनोग्राफी सेंटरसाठी
मुलगी पाहिजे
कॉम्प्युटर व इंग्रजी
टायपिंग येणे आवश्यक
(२ जागा त्वरीत भरणे आहे)
कामाची वेळ दु. १२ ते ८
संपर्क– जाधव सोनोग्राफी सेंटर
मर्चंट बँकेसमोर, नविन नगर रोड, संगमनेर
9307188862

**पाहिजेत**
सेल्समन
(महिला/ युवती प्राधान्य)
लिरा द
कॉस्मेटिक्स झोन
वृंदावन अपार्टमेंट, गणेश नगर
मो. 7499630747

**नोकरीची सुवर्णसंधी**
श्री गणेश टायर्स
अकाऊंटंट - १
टॅली, जीएसटी ज्ञानास प्राधान्य
सेल्स एक्झीक्युटिव्ह - १
बॅटरी व इंजिन ऑईलच्या विक्री क्षेत्रातील अनुभव
अनुभावानुसार आकर्षक पगार
पत्ता - तीन बत्ती चौक, संगमनेर
८९९९८६२७५९

**पाहिजेत**
राजवीर फार्मा
मेडीकल एजन्सी कामाकरिता
फक्त गरजुंनी संपर्क साधावा
पुरूष – ४ जागा
(वय- १८ ते ४०)
रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस
ठिकाण– जाणता राजा रोड, मुथुट फायनान्स पाठीमागे, २ नं गल्ली, संगमनेर
8669184141

**पाहिजेत**
युवा ध्येय वृत्तपत्र संगमनेर
कार्यालयासाठी अर्जंट पाहिजे
उपसंपादक - १ M
जाहिरात व्यवस्थापक - १ M
डिझायनर - १ M/F
टेलिकॉलर - १ M/F
कार्यालय - युवा ध्येय, विठ्ठल स्मृती कॉम्प्लेक्स, अकोले रोड, संगमनेर
फोन (०२४२५)२६१८७२
७७६८०७९२७२, ९३७०७७३५०४

**भाड्याने देणे आहे**
सर्व सुविधायुक्त
०१ बीएचके
रो - हाऊस
भाड्याने देणे आहे
सुकेवाडी रोड, संगमनेर
8282825818

**बालाजी गॅस, संगमनेर**
**पाहिजेत**
कॉम्प्युटर ऑपरेटर
(२ जागा, १ महिला, १ पुरूष)
योग्य पगार व इतर सवलती
- संपर्क -
8600828485
9370025610

**पाहिजेत**
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
पार्ट टाइम /फुल टाइम काम मिळेल ( सेक्युरिटी गार्ड
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

**कामासाठी मुले, मुली पाहिजेत**
अकाऊंटंट - १ (म.)
हेल्पर - १ (पु.)
सेल्समन - १ (पु./ म.)
कामाचा अनुभव आवश्यक
9422905155
9763232269

**पाहिजेत**
जानकीराम गंगाधर काजळे ज्वेलर्ससाठी
सेल्स एक्झीक्युटिव्ह -४
मार्केटिंग एक्झीक्युटिव्ह -४
हेल्पर - २
मेन रोड, संगमनेर
7588249849

SR THORAT — JOB — GAGANGIRI PACKAGED PURITY

| Sr. No. | Post | QTY | Qualification and Experience |
|---|---|---|---|
| 1 | Security Guard | 5 | Experience Minimum 5 Year (Ex-Servicemen preferred) |
| 2 | Fitter/Welder/ Mechanical/ Electrical/ Refrigeration | 5 | ITI,DME or any Graduate, Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |
| 3 | Data Operator/ Supervisor | 5 | Any Graduate, Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |
| 4 | Chemist | 5 | B.Sc. Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |

Office Address-S.R.Thorat Milk Products Pvt.Ltd, Rajapur Road,Sangamner, Dist- Ahilyanagar
Mobile Number – 9860100936/937
Sent the CV Following E-Mail Id:
admin@srthoratmilk.com / hr@srthoratmilk.com



# गणेशोत्सवाआधी रस्ते दुरुस्त करा

## शिवसेना महायुतीचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शहरातील भूमिगत गटार योजनेच्या कामामुळे अनेक रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून, गणेशोत्सवापूर्वी शहरातील सर्व प्रमुख रस्त्यांवरील खड्डे तातडीने बुजवावेत, अशी मागणी शिवसेना महायुतीच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडे निवेदन सादर करण्यात आले.

संगमनेर शहरात नगरपालिकेच्या माध्यमातून भूमिगत गटार योजनेचे काम करण्यात आले. या कामासाठी विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात रस्ते खोदण्यात आले. मात्र, काम पूर्ण झाल्यानंतर रस्त्यांची योग्य पद्धतीने दुरुस्ती न झाल्याने अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे वाहनचालक, नागरिक, शाळकरी मुले, वृद्ध नागरिक तसेच दुचाकीस्वारांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरात नागरिकांची वर्दळ वाढणार असून, विविध गणेश मंडळांच्या मिरवणुका आणि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन होणार आहे. अशा परिस्थितीत रस्त्यांवरील खड्डे अपघातांना कारणीभूत ठरू शकतात. त्यामुळे उत्सवापूर्वी रस्त्यांची दुरुस्ती करून नागरिकांना दिलासा देण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली. शहरातील रस्त्यांच्या दुरवस्थेबाबत शांतता समितीच्या बैठकीतही चर्चा झाली होती. मात्र, त्यानंतरही नगरपालिकेच्या प्रशासनाकडून ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप शिवसेना महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी केला. जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन नगरपरिषद प्रशासनाला आवश्यक निर्देश द्यावेत, तसेच भूमिगत गटार योजनेमुळे खराब झालेल्या रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी करण्यात आली. यावेळी शिवसेना महायुतीचे राहुल भोईर, प्रशांत नामन, गुड इंजिनिअर, बबलू काजी, जावेद शेख, सागर भोईर, पवन शिरतार, भगवान कुक्कर, महेश मांडकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# नेपाळमध्ये पुन्हा हाहा:कार ?

## जलप्रलयानंतर आणखी मोठा हायअलर्ट

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

महाभयंकर जलप्रलयातून नेपाळ सावरत आहे. नेपाळवरील संकट आता टळल्याचं सांगितलं जात असतानाच पुन्हा धडकी भरवणारी बातमी समोर आली आहे. नेपाळवर आणखी एका नैसर्गिक ओढवलं आहे. दार्चुला जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर भूस्खलन सुरू झालं आहे. त्यामुळे चौलानी नदीचा प्रवाह काहीप्रमाणात बाधित झाला आहे. नदीत मातीचा मोठा ढिगारा कोसळल्याने प्रशासनाने नदीच्या खालच्या बाजूला राहणाऱ्या नागरिकांना सतर्क केलं आहे. जर सातत्याने भूस्खलन झालं आणि ढिगाऱ्याने नदीचा रस्ता अडवला तर अचानक बांध फुटून जलप्रलयासारखी परिस्थिती निर्माण होऊ शकते, असा संशय अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे नेपाळी नागरिकांच्या तोंडचं पाणी पळालं आहे.

दार्चुला जिल्ह्यातील अपी हिमाल ग्रामीण नगर पालिका क्षेत्रातील भट्टार येथे भूस्खलन झालं आहे. डोंगरातून मोठ्या प्रमाणावर ढिगारा चौलानी नदीत पडत आहे. त्यामुळे नदीचा प्रवाह बाधित झाला आहे. भूस्खलन सातत्याने सुरूच राहिलं तर नदीचा आकार छोटा होऊ शकतो. त्यामुळे पाणी जमा होऊन खालच्या भागाकडे वेगाने वाहू शकतं. त्यामुळे फ्लॅश फ्लड म्हणजे महाजलप्रलयाचा धोका निर्माण होऊ शकतो, असं दार्चुलाच्या जिल्हा प्रशासनाने म्हटलं आहे.नदीच्या किनाऱ्याला आणि नदीच्या खालच्या भागात राहणाऱ्या नागरिकांना तात्काळ दूर जाण्याचे तसेच सतर्क राहण्याचे आदेश प्रशासनाने दिले आहे. या ठिकाणी सुरक्षा दलाच्या जवानांनाही तैनात करण्यात आलं आह. हे जवान जवळपासच्या नागरिकांना धोक्याचा इशारा देत आहेत. आपत्कालीन परिस्थितीत कारवाईसाठी तयार राहण्याच्या वारंवार सूचनाही हे लोक देत आहेत, असं प्रशासनाने स्पष्ट केलं आहे.

सुदूरपश्चिम प्रदेशाचे मुख्यमंत्री खगराज भट्ट यांनी स्थानिक प्रशासन आणि सुरक्षा यंत्रणांना हाय अलर्ट जारी केला आहे. त्यांनी अधिकाऱ्यांना कोणत्याही संभाव्य परिस्थितीला नियंत्रणात आणण्यासाठी तयार राहण्याचे आदेश दिले आहेत. तसेच प्रशासनाने महापूर आणि आपत्तीशी संबंधित मदतीसाठी आपत्कालीन नंबरही जारी केले आहेत. गरज पडल्यास नागरिकांना मदत मिळावी म्हणून हे नंबर जारी करण्यात आले आहेत.

दरम्यान, चौलानी नदीचा जलस्तर सामान्य असल्याचं सशस्त्र पोलीस दलाने म्हटलं आहे. मात्र, परिस्थितीवर नजर ठेवली जात आहे. बलांच स्थित नेपाळ चमोलिया हायड्रोपॉवर सुरक्षा बेसमधून सुरक्षा कर्मचाऱ्यांना संपूर्ण परिसरावर नजर ठेवण्यासाठी पाठवण्यात आलं आहे.

# पाच महिन्यांपासून सर्कलचे काम अपूर्ण

## पालिकेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : शहरातील महात्मा फुले चौक, पावबाकी परिसरातील सर्कल उभारणीचे काम सुरू होऊन तब्बल पाच महिने उलटले असतानाही काम अद्याप पूर्ण झालेले नाही. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत असून, छोट्या स्वरूपाच्या कामाला एवढा मोठा कालावधी का लागत आहे, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

महात्मा फुले यांची जयंती ११ एप्रिल रोजी असल्याने त्याच्या सुमारे पंधरा दिवस आधी सर्कल उभारणीचे काम सुरू करण्यात आले होते. सुरुवातीला काही काळ काम वेगाने सुरू होते. मात्र त्यानंतर काम अर्धवट अवस्थेत थांबले असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. सध्या अपूर्ण सर्कलमुळे परिसराचे सौंदर्य बिघडत असून वाहतुकीच्या दृष्टीनेही नियोजनाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

संगमनेर नगर परिषदेकडून शहरात विविध विकासकामे हाती घेतली जात आहेत. मात्र सुरू करण्यात आलेली कामे निर्धारित वेळेत पूर्ण करण्याची जबाबदारी नेमकी कोणाची, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. विकासकामांसाठी नागरिकांना केवळ आश्वासने नकोत तर प्रत्यक्षात कामे वेळेत पूर्ण झालेली पाहिजेत, अशी भावना व्यक्त होत आहे.

महात्मा फुले चौकातील सर्कलचे रखडलेले काम संबंधित विभागाने तातडीने पूर्ण करून परिसराला सुस्थिती व आकर्षक स्वरूप द्यावे, अशी मागणी युवक काँग्रेस शाखा महात्मा फुले चौक बूथ क्रमांक ५५चे अध्यक्ष ओम रवींद्र पावबाके, उपाध्यक्ष आदित्य शिवदास हिरे, सचिव रवींद्र पुंजा सातपुते, संघटक सुरज भाऊशीराम भालेराव, खजिनदार योगेश बाळूबाके, तसेच सदस्य मंडळातील चंद्रकांत मच्छिंद्र पावबाके, किशोर अशोक सातपुते, संदीप बच्छाव सातपुते, बाळासाहेब अशोक राऊत, सुनील रामनाथ सातपुते, निलेश सातपुते, विजय राजगुरू, संतोष अशोक सातपुते, अक्षय राऊत, जालिंदर सातपुते, सुदर्शन भाऊसाहेब पावबाके यांच्यासह नागरिकांनी केली आहे

# कॅनॉलच्या पाण्याचा गैरवापर, शेतकऱ्यांचे मोठे नुकसान





युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : मौजे पानोडी, ता. संगमनेर, येथील गट क्रमांक ३३१ व ३३२ मधील गाळपेर जमिनीबाबत गंभीर प्रकार समोर आला असून, गावातील काही ठराविक व्यक्तींकडून पाट फोडून मोठमोठे पाइप टाकून पाणी कृत्रिमरीत्या शेतांमध्ये वळविले जात असल्याचा आरोप परिसरातील शेतकऱ्यांनी केला आहे.

या प्रकारामुळे हातातोंडाशी आलेल्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, पाणी शेतमालासह विहिरी, मोटारी तसेच काही राहत्या घरांमध्ये शिरल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. विशेष म्हणजे, संबंधित जमिनीचा शासनाकडून कोणताही मोबदला घेतलेला नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

पाण्याचा प्रवाह वाढल्याने या गटातील शेतकऱ्यांना स्वतःच्या विहिरीतून पिण्यासाठी तसेच जनावरांसाठी पाणी काढण्यासाठी मोटार सुरू करण्यासाठी पाण्यातून जाणेही कठीण झाले आहे. त्यामुळे शेतकरी कुटुंबांमध्ये प्रचंड चिंता आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे.

सदर प्रकार तातडीने थांबविण्यात आला नाही तर शेतकऱ्यांचे आर्थिक व मानसिक नुकसान आणखी वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. काही शेतकरी अत्यंत तणावाखाली असल्याने परिस्थिती हाताबाहेर जाण्यापूर्वी प्रशासनाने गांभीर्याने दखल घेणे आवश्यक असल्याचे शेतकऱ्यांनी म्हटले आहे.

या प्रकरणाची संबंधित महसूल, पाटबंधारे, ग्रामपंचायत तसेच इतर शासकीय यंत्रणांनी युद्धपातळीवर पाहणी करून पाण्याचा अनधिकृत वळविलेला प्रवाह तातडीने बंद करावा, नुकसानग्रस्त पिकांची प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामा करावा आणि दोषींवर नियमानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

शेतकऱ्यांच्या शेतीचे, पिण्याच्या पाण्याचे आणि जनावरांच्या पाण्याचे संरक्षण करणे ही प्रशासनाची जबाबदारी असून, कोणत्याही दबावाला बळी न पडता या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, अशीही मागणी होत आहे. प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून संभाव्य अनुचित प्रकार टाळावा आणि शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा, अशी गट नं. ३३१ व ३३२ मधील शेतकऱ्यांची कळकळीची मागणी आहे.

## दिनविशेष

२०२२: कोविड-१९ महामारी — भारताने कोविड-१९ अनुनासिक (Nasal Vaccine) लस मंजूर केली आणि चीननंतर असे करणारा दुसरा देश बनला.

२०२२: लिझ ट्रस — युनायटेड किंगडमच्या पंतप्रधान बनल्या.

१९९७: — अमेरिकेच्या नॅशनल एन्डाऊमेंट फॉर द आर्टस संस्थेची सरोदवादक अमजद अली खान यांना नॅशनल हेरिटेज फेलोशिप मिळाली.

१९९३: — ज्येष्ठ कवी विंदा करंदीकर यांची कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या जनस्थान पुरस्कारासाठी निवड.

१९६८: — स्वाझीलँड हा देश स्वतंत्र झाला.

१९६६: — दक्षिण आफ्रिकेच्या पंतप्रधान हेन्ड्रिक व्हेरवोर्डची संसदेत भोसकून हत्या.

१९६५: — पहिल्या भारत पाकिस्तान युद्धाची सुरुवात झाली.

१९५२: — कॅनडातील पहिले दूरचित्रवाणी केंद्र मॉंट्रिअल येथे सुरू झाले.

१९३९: — दुसरे महायुद्ध दक्षिण अफ्रिकेने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले.

## जन्म

१९७१: देवांग गांधी — भारतीय क्रिकेट खेळाडू

१९६८: सईद अन्वर — पाकिस्तानी फलंदाज

१९५७: जोशे सॉक्रेटिस — पोर्तुगालचे पंतप्रधान

१९२९: यश जोहर — भारतीय चित्रपट निर्माते (निधन: २६ जून २००४ )

१९२३: पीटर (दुसरा) — युगोस्लाव्हियाचे राजा

१९२१: नॉर्मन जोसेफ वोंडलँड — बारकोडचे सहनिर्माते (निधन: ९ डिसेंबर २०१२ )

१९२१: नॉर्मन जोसेफ व्हाउडलँड — बार-कोडचे सहसंशोधक (निधन: ९ सप्टेंबर २०१२ )

१९१५: फ्रांझ जोसेफ स्ट्रॉस — बव्हेरियन लेफ्टनंट आणि राजकारणी, बव्हेरिया देशाचे मंत्री अध्यक्ष (निधन: ३ ऑक्टोबर १९८८ )

१९०१: कमलाबाई रघुनाथ गोखले — भारतीय चित्रपटसृष्टीतील पहिल्या स्त्री कलाकार (निधन: १८ मे १९९७ )

१८९२: सर एडवर्ड ॲपलटन — ब्रिटिश भौतिकशास्त्रज्ञ — नोबेल पुरस्कार

१८८९: बॅ. शरदचंद्र बोस — स्वातंत्र्यसेनानी, सुभाषचंद्र बोस यांचे वडील बंधू (निधन: २० फेब्रुवारी १९५० )

## मृत्यू

२०२२: अरविंद गिरी — भारतीय राजकारणी, उत्तर प्रदेशचे आमदार (जन्म: ३० जून १९५८ )

२०२२: उमेश कट्टी — भारतीय राजकारणी, कर्नाटकचे आमदार (जन्म: १४ मार्च १९६१ )

२०१९: रॉबर्ट मुगाबे — झिम्बाब्वे देशाचे २रे राष्ट्रपती (जन्म: २१ फेब्रुवारी १९२४ )

२००७: लुसियानो पाव्हारॉटी — इटालियन ऑपेरा गायक

१९९०: लेन हटन — इंग्लिश क्रिकेटपटू (जन्म: २३ जून १९१६ )

१९७९: पी. के. मुकिया तेवर — ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक पक्षाचे अध्यक्ष (जन्म: ४ एप्रिल १९२३ )

१९७८: अडॉल्फ डॅस्लर — ॲडिडासचे संस्थापक (जन्म: ३ नोव्हेंबर १९०० )

१९७२: अल्लाउद्दीन खान — जगप्रसिद्ध सरोदवादक व संगीतकार

१९६३: गोविंद पै — कन्नड कवी आणि राष्ट्रकवी (जन्म: २३ मार्च १८८३ )

१९३८: सली प्रुडहॉम — फ्रेंच लेखक — नोबेल पुरस्कार

१९७८: रॉय किणीकर — कवी, संवादलेखक, नाटककार व पत्रकार




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**०६ सप्टेंबर**

## भारताने कोविड-१९ अनुनासिकलस मंजूर केली आणि चीननंतर असे करणारा दुसरा देश बनला.




२०२२ हे वर्ष भारताच्या कोविड-१९विरोधी लसीकरण मोहिमेतील महत्त्वाचे वर्ष ठरले. कोरोनाव्हायरसच्या संसर्गाला आळा घालण्यासाठी इंजेक्शनद्वारे दिल्या जाणाऱ्या लसींबरोबरच नाकावाटे देण्यात येणाऱ्या (Nasal Vaccine) लसीच्या विकासालाही वेग आला. या लसीमुळे कोविडविरोधातील प्रतिबंधात्मक उपाययोजनांमध्ये एक नवा पर्याय उपलब्ध झाला.भारताने २०२२ मध्ये नाकावाटे देण्यात येणाऱ्या कोविड-१९ लसीला मंजुरी दिली. या लसीचे नाव iNCOVACC असे असून ती भारत बायोटेकने वॉशिंग्टन युनिव्हर्सिटी स्कूल ऑफ मेडिसिनच्या सहकार्याने विकसित केली होती. सुरुवातीला ही लस बूस्टर डोसच्या स्वरूपात प्रौढांसाठी उपलब्ध करण्यात आली. पारंपरिक इंजेक्शनऐवजी नाकावाटे लस देण्याची पद्धत असल्यामुळे लसीकरण अधिक सोपे आणि सुलभ करण्याच्या दृष्टीने हा महत्त्वाचा टप्पा मानला गेला.नाकावाटे लसीमागील संकल्पना अशी होती की, कोरोना विषाणूचा शरीरात प्रवेश प्रामुख्याने नाक आणि श्वसनमार्गातून होतो. त्यामुळे नाकावाटे दिली जाणारी लस स्थानिक पातळीवर रोगप्रतिकारक प्रतिसाद निर्माण करण्यास मदत करू शकते. यामुळे विषाणूचा संसर्ग आणि त्याचा प्रसार कमी करण्याची शक्यता निर्माण होते. मात्र, लसीचा प्रत्यक्ष परिणाम व्यक्तीनुसार आणि विषाणूच्या प्रकारानुसार बदलू शकतो.भारतासाठी ही उपलब्धी वैज्ञानिक संशोधन आणि जैवतंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगतीचे प्रतीक होती. कोविड-१९ महामारीच्या काळात भारतीय कंपन्या आणि संशोधन संस्थांनी लस निर्मिती, चाचण्या आणि उत्पादन क्षेत्रात मोठी क्षमता दाखवली. देशात मोठ्या प्रमाणावर लसीकरण मोहीम राबवण्यात आली आणि कोविशील्ड, कोव्हॅक्सिन यांसारख्या लसींच्या माध्यमातून लाखो नागरिकांचे लसीकरण करण्यात आले.नाकावाटे देण्यात येणाऱ्या लसीचा आणखी एक महत्त्वाचा फायदा म्हणजे इंजेक्शनची गरज नसणे. त्यामुळे सुईची भीती असलेल्या व्यक्तींसाठी ही पद्धत अधिक सोयीची ठरू शकते. तसेच मोठ्या प्रमाणावर लसीकरण करताना प्रशासनासाठीही ही पद्धत उपयुक्त ठरण्याची शक्यता होती.भारताने २०२२ मध्ये घेतलेला हा निर्णय देशाच्या आरोग्य क्षेत्रातील संशोधनासाठी महत्त्वाचा मानला गेला.

# कमलाबाई गोखले : पहिली महिला कलाकार

**जन्मदिन विशेष**

भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासात कमलाबाई रघुनाथ गोखले यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला महिलांनी रंगभूमीवर किंवा चित्रपटात काम करणे समाजमान्य नव्हते. अशा प्रतिकूल परिस्थितीत कॅमेऱ्यासमोर येऊन अभिनय करणाऱ्या पहिल्या पिढीतील महिला कलाकारांमध्ये कमलाबाईंचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांना भारतीय चित्रपटसृष्टीतील पहिल्या बाल-अभिनेत्रींपैकी एक म्हणूनही ओळखले जाते.कमलाबाईंचा जन्म ६ सप्टेंबर १९०१ रोजी झाला, अशी मराठी संदर्भांमध्ये नोंद आढळते. त्यांच्या आई दुर्गाबाई कामत या स्वतः कलावंत होत्या. घरातील कलात्मक वातावरणामुळे कमलाबाईंना लहानपणापासूनच अभिनयाची आवड निर्माण झाली. वयाच्या अवघ्या काही



वर्षांपासून त्यांनी रंगभूमीवर काम करण्यास सुरुवात केली. पुढे त्या मराठी रंगभूमीवरील महत्त्वाच्या अभिनेत्री बनल्या.भारतीय चित्रपटसृष्टीचा प्रारंभिक काळ हा अत्यंत आव्हानात्मक होता. दादासाहेब फाळके यांनी १९१३ मध्ये राजा हरिश्चंद्र हा भारतातील पहिला पूर्ण लांबीचा भारतीय चित्रपट तयार केला. मात्र त्या काळात महिलांनी चित्रपटात काम करण्यास नकार दिल्यामुळे या चित्रपटातील स्त्री व्यक्तिरेखा पुरुष कलाकाराने साकारली होती.फाळके यांच्या पुढील चित्रपटासाठी मात्र महिला कलाकारांची आवश्यकता होती. त्यातून 'मोहिनी भस्मासुर' (१९१३) या चित्रपटात दुर्गाबाई कामत आणि त्यांची कन्या कमलाबाई यांना अभिनयाची संधी मिळाली. दुर्गाबाईंनी पार्वतीची भूमिका, तर कमलाबाईंनी मोहिनीची भूमिका साकारली. या चित्रपटामुळे कमलाबाई भारतीय चित्रपटाच्या पडद्यावर दिसणाऱ्या पहिल्या महिला कलाकारांपैकी एक ठरल्या आणि त्या काळातील पहिल्या महिला बालकलाकार म्हणून त्यांचे नाव इतिहासात नोंदले गेले.कमलाबाईंचे योगदान केवळ एका चित्रपटापुरते मर्यादित नव्हते. त्यांनी पुढील अनेक दशके रंगभूमी आणि चित्रपट क्षेत्रात काम केले. अभिनयातील त्यांचा अनुभव, आत्मविश्वास आणि कलेप्रती असलेली निष्ठा यामुळे त्या पुढील पिढ्यांसाठी प्रेरणास्थान ठरल्या. त्यांचा विवाह अभिनेते रघुनाथराव गोखले यांच्याशी झाला. त्यांचे कुटुंब पुढेही अभिनय क्षेत्राशी जोडले गेले. त्यांचा मुलगा चंद्रकांत गोखले आणि नातू विक्रम गोखले यांनीही अभिनय क्षेत्रात उल्लेखनीय काम केले.कमलाबाईंच्या आयुष्यावर 'Kamlabai' नावाचा माहितीपटही तयार करण्यात आला. रीना मोहन दिग्दर्शित या माहितीपटात त्यांच्या प्रदीर्घ कलाप्रवासाचा आणि भारतीय रंगभूमी व चित्रपटाच्या सुरुवातीच्या काळाचा मागोवा घेण्यात आला आहे.कमलाबाई गोखले यांचे निधन १७ मे १९९७ रोजी पुणे येथे झाले.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
• कमी वेदना, जलद बरे होणे
• लेझर व प्रगत तंत्रज्ञान
• अनुभवी जड्ञ डॉक्टरांचा सल्ला
• गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०





श्री महाकालेश्वराचे अलौकिक दर्शन!
श्रावण मासानिमित्त भक्ती शक्ती मंदिरात, उज्जैनच्या
श्री महाकालेश्वराचा प्रतिरूपाचे दर्शनाचा लाभ घ्यावा.
श्रावण मासारंभ निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा !
भक्ती शक्ती मंदिर
डेरे फाउंडेशन कॅम्पस, कऱ्हे फाटा, नाशिक-पुणे हायवे, संगमनेर



# अवैध धंदे, वाळू तस्करांवर मोक्का, तडीपारी आणि एमपीडीएची कारवाई करा - जिल्हाधिकारी डॉ. आशिया

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील अवैध धंदे, वाळू-मुरूमाचे बेकायदेशीर उत्खनन व तस्करी करणाऱ्यांविरोधात आता कठोर पावले उचलण्याचे निर्देश अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी प्रशासनाला दिले आहेत. अशा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींवर मोक्का, तडीपारी तसेच एमपीडीए कायद्यान्वये कारवाई करण्याच्या सूचना त्यांनी केल्या. आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर तालुक्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी गुन्हेगारांवर व्यापक प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचेही त्यांनी स्पष्ट केले.



संगमनेर उपविभागीय अधिकारी कार्यालयात आयोजित सर्व शासकीय विभागांच्या आढावा बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. आशिया बोलत होते. यावेळी प्रांताधिकारी अरुण उंडे, उपविभागीय पोलिस अधिकारी कुणाल सोनवणे, तहसीलदार धीरज मांजरे, गटविकास अधिकारी प्रविण सीनारे, उपविभागीय वन अधिकारी अमरजीत पवार, मुख्याधिकारी श्री. गोरे, सर्व पोलिस निरीक्षकांसह तालुकास्तरीय अधिकारी उपस्थित होते.

कांजरभाट समाजातील नागरिकांना जात प्रमाणपत्र मिळविताना येणाऱ्या अडचणींची दखल घेत महसूल प्रशासनाने घुलेवाडी, गुंजाळवाडी व धांदरफळ बुद्रुक येथे स्थानिक पातळीवर चौकशी करून जात प्रमाणपत्रे निर्गमित केली. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या हस्ते संगमनेर उपविभागीय अधिकारी कार्यालयात या समाजातील शालेय विद्यार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात जात प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणाचा मार्ग सुकर झाला आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी संगमनेर नगरपालिकेला भेट देत प्रशासकीय कामकाजाचा आढावा घेतला. शहरातील सर्व अनधिकृत अतिक्रमणे तातडीने हटविण्याचे, मोकाट जनावरांचा बंदोबस्त करण्याचे तसेच घनकचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

डिजिटल क्रॉप सर्व्हेअंतर्गत ई-पीक पाहणी मोहिमेला गती देत पुढील सात दिवसांत ३३ टक्के ई-पीक पाहणी पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. मालदाड येथे जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी थेट शेतात जाऊन डिजिटल क्रॉप सर्व्हे पद्धारे एका शेतकऱ्याची ई-पीक पाहणी नोंदवून घेतली.

## अनेक वर्षांपासून बंद रस्ते झाले खुले

**जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी दौऱ्यादरम्यान प्रशासनाने अतिक्रमणमुक्त केलेल्या पांदण व शेतरस्त्यांची प्रत्यक्ष पाहणी केली. घुलेवाडी–मालदाड शीवरस्ता, मंगळापूर फाटा येथील पांदण रस्ता, चिखली येथील कौठाचा मळा वस्तीचा रस्ता आणि कोकणेवाडी रस्ता प्रशासनाने अतिक्रमणमुक्त करून मुरुम टाकून वाहतुकीसाठी खुले केले आहेत. चिखली येथील कौठाचा मळा वस्तीचा सुमारे १५ वर्षांपासून बंद असलेला रस्ता मागील पंधरवड्यात खुला करण्यात आला. तर कोकणेवाडी येथील २०१७ पासून अतिक्रमित असलेला रस्ताही खुला करून मुरूमीकरण करण्यात आले आहे. सायंकाळी उशिरा जिल्हाधिकाऱ्यांनी शेळकेवाडी–बोटा रस्त्याचीही पाहणी केली.**

# शेतकरी कुटुंबाचा आधारवड हरपला

## कै. गुलाब (भाऊ)दामोदर नवले यांना भावपूर्ण श्रद्धांजली



अकोले तालुक्यातील नवलेवाडी येथील प्रगतशील शेतकरी व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते कै. गुलाब (भाऊ) दामोदर नवले यांचे दि.२९ ऑगस्ट रोजी दुर्दैवी निधन झाले. वयाच्या अवघ्या १२व्या वर्षापासून काळ्या आईची सेवा करत शेतीशी नाते जोडलेल्या कै. नवले यांनी संपूर्ण आयुष्य कष्ट, प्रामाणिकपणा आणि जिद्दीच्या जोरावर उभे केले.

दि. २९ ऑगस्ट रोजी दुपारी ते आपल्या शेतात सोयाबीन पिकाला पाणी भरत असताना अचानक सापाने त्यांना दंश केला. सुरुवातीला काही वेळ त्यांना या घटनेची कल्पना झाली नाही. मात्र साप दिसल्यानंतर परिस्थितीचे गांभीर्य लक्षात आले. त्यांनी तत्काळ आपले पुत्र सुजित नवले यांना फोन करून माहिती दिली. माहिती मिळताच सुजित नवले यांनी वडिलांना उपचारासाठी तातडीने अकोले येथील खासगी रुग्णालयात घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. मात्र नियतीच्या मनात वेगळेच होते. उपचारापूर्वीच रस्त्यात त्यांची प्राणज्योत मालवली. या घटनेने नवलेवाडी परिसरात शोककळा पसरली.

कै. गुलाब नवले यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत कुटुंबाचा उदरनिर्वाह करत आपल्या कष्टाने संसार उभा केला. शेती हेच त्यांचे जीवन होते. शेतमजुरी, शेतीतील कष्ट आणि मेहनतीच्या जोरावर त्यांनी आपल्या कुटुंबाला आधार दिला. साधी राहणी, प्रेमळ स्वभाव आणि सामाजिक बांधिलकी यामुळे ते परिसरात परिचित होते.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांचे सुपुत्र सुजित नवले हे बुबासाहेब नवले पतसंस्थेचे संचालक तसेच अकोले शहरातील सुजाता ऑफसेट व प्रिंटिंग प्रेसचे मालक आहेत. तसेच सचिन नवले यांचे ते वडील होते.नवले परिवारातील या आधारवडाच्या जाण्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

या दुःखद प्रसंगातून सुजित नवले यांनी सर्व शेतकरी बांधवांना काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. शेतकरी बांधवांनी शेतात काम करताना स्वतःच्या सुरक्षिततेची काळजी घ्यावी. विशेषतः रात्रीच्या वेळी शेतात जाताना, पिकांना पाणी देताना टॉर्च, मोबाईल लाईट, योग्य पादत्राणे वापरावीत. गवत, बांध, दगड किंवा पाण्याच्या ठिकाणी साप असण्याची शक्यता लक्षात घेऊन सावधगिरी बाळगावी. कोणतीही घटना घडल्यास वेळ न घालवता तातडीने वैद्यकीय उपचार घ्यावेत.




एका कुटुंबाने अनुभवलेले हे दुःख दुसऱ्या कोणत्याही परिवाराच्या वाट्याला येऊ नये, हीच भावना या संदेशामागे आहे. शेती करताना शेतकऱ्यांनी आपल्या जीवाचीही तितकीच काळजी घेणे आवश्यक आहे.

कै. गुलाब (भाऊ) दामोदर नवले यांना भावपूर्ण श्रद्धांजली. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो व नवले परिवाराला हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो.

- सामाजिक संदेश : काळ्या आईची सेवा करताना स्वतःच्या सुरक्षिततेची काळजी घेणे हीच खरी शहाणपणाची शेती आहे.

**- किशोर आव्हाड**
**उपसंपादक,**
**दैनिक युवावार्ता, संगमनेर**

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
• मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
• पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
• हेल्थ इंडिया इन्शुरन्स
• FHPL हेल्थ इन्शुरन्स
• इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
• बजाज आलियांज इन्शुरन्स
• एसबीआय जनरल इन्शुरन्स
• ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
• मेडसेव टीपीए प्रा.लि.
• जेनिन्स इंडिया टीपीए लि.
• ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
• टाटा एआयजी इन्शुरन्स
• रिलायन्स जनरल इन्शुरन्स
• मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
• चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
• नॅशनल इन्शुरन्स कं.
• न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
• निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
• युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
• स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
• दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
• एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
• युनायटेड हेल्थकेअर लि.
• Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
• मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
• एम.डी.इंडिया हेल्थकेअर
• विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
• पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165


दर्शन टेक्सटाईल मार्केट
तुमच्या प्रत्येक लूकसाठी खास डिझाइन्स
30% ते 70% डिस्काउंट सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
टी शर्ट | जिन्स | फॉर्मल ड्रेस
ब्लेझर | जाकेट
संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी

आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
※ कर्ज रक्कम वाढ । ※ कर्ज व्याजदर कमी । ※ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

मार्स युनिव्हर्स
प्रायव्हेट लिमिटेड
टूर्स, ट्रॅव्हल्स आणि कॉर्पोरेट सर्व्हिसेस
तुमचे पाऊल मंगळावर ठेवण्यासाठी मार्स युनिव्हर्स सज्ज

प्रति व्यक्ती 59,000/-* (फुकेत, बँकॉक)
प्रति व्यक्ती 79,000/-* (व्हिएतनाम, सिंगापूर, बाली)
आंतरराष्ट्रीय टूर पॅकेजेस | कॉर्पोरेट इव्हेंट मॅनेजमेंट | मिटींग्स, इन्सेंटिव्ह टूर्स | विश्वसनीय सेवा उत्तम नियोजन
1 ला ग्रुप - 26 सप्टेंबर
2 रा ग्रुप - 1 ऑक्टोबर
3 रा ग्रुप - 10 ऑक्टोबर
संपर्क - किशोर सोनवणे 9309429705

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
कुटे हॉस्पिटल
अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६

डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist

डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25